महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स् इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
- इलेक्ट्रिकल सुपरवायझर
- इलेक्ट्रिकल वायरमन
- टू-व्हीलर मेकॅनिक
- A.C. मेकॅनिक
- कॉम्प्युटर ऑपरेटर
- ॲटोमोबाईल टेक्निशियन
- मोटार वाइंडिंग
- फोर व्हीलर मेकॅनिक
- वेल्डर / प्लंबर
- कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...

व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल/व्हॉटस्ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ९० वा | गुरुवार, दि. ३० ऑक्टोबर २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# शेतकऱ्यांचा मोठा आक्रोश! ‘सुरुवात फडणवीसांनी केली, शेवट आम्ही करणार, आम्हाला जेलमध्ये टाका’

## आंदोलन न थांबवता मुख्यमंत्र्यांशी चर्चा करणार, बच्चू कडू, राजू शेट्टींसह शेतकरी नेते सहमत

**नागपूर (कटूसत्य वृत):-** राज्यातील महायुती सरकारविरोधात मोठ्या संख्येने शेतकरी रस्त्यावर उतरले आहे. बच्चू कडू यांच्या नेतृत्वात हजारो शेतकऱ्यांनी रस्त्यावर ठिय्या दिला आहे. या मोर्चात प्रमुख शेतकरी नेते सहभागी झालेत.

त्यात माजी मंत्री महादेव जानकर यांनी आक्रमक भाषण करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. देवेंद्र फडणवीस सुरुवात तुम्ही केली, शेवट आम्ही करणार.. जेलमध्येही जायला आम्ही तयार आहोत पण मागे हटणार नाही असा इशाराच त्यांनी मोर्चातून सरकारला दिला.

महादेव जानकर म्हणाले की, सरकार बदलल्याशिवाय देवेंद्र फडणवीस यांना शांत बसू देणार नाही. महाराष्ट्रात आम्ही मोठ्या प्रमाणात रस्त्यावर उतरू. आम्ही लोकशाही मार्गाने मोर्चा काढतोय, तो कुणाला दिसत नाही. जनता कोर्ट आहे. जोपर्यंत नेते सांगत नाहीत, तोपर्यंत आंदोलन थांबणार नाही. महाराष्ट्रातील एकही जेलमध्ये रिकामे ठेवणार नाही. आमच्या माणसांना घेऊन जावा, आम्ही जेलमध्ये जायला तयार आहोत. सरकार मागे हटतंय की आम्ही हटतोय हे आम्हाला बघायचे आहे. देवेंद्र फडणवीस तुमचा बिस्तारा नागपूरला आणल्याशिवाय आम्ही शांत राहणार नाही असा इशारा त्यांनी दिला.

तर पोलिसांनी कोर्टाचा आदेश आपल्याला आणून दिला. सहा वाजायच्या आत रस्ता रिकामा करा असा आदेश दिलाय. आदेश देणाऱ्यांना इंग्रजांनी काढलंय का हे आम्हाला माहिती नाही. आदेश देताना संदर्भ एका इंग्रजी पेपरचा घेतलेला आहे. एकाबाजूने सरकार चर्चेस तयार आहे असं सांगते,



दुसऱ्या बाजूला कोर्टाची ऑर्डर येते. शिखंडीचा डाव सरकारमधील कुणी खेळत असेल तर त्यांच्या कमरेला चड्डीही शिल्लक राहणार नाही हे लक्षात ठेवावे. आम्ही संविधानाचा आदर करतो पण न्यायव्यवस्थेनेही जबाबदारीने वागले पाहिजे असं जबाबदार नागरीक म्हणून सांगतोय. न्यायव्यवस्था भरकट चाललीय का असा प्रश्न निर्माण होतो. भविष्यात सगळ्या प्रश्नांची उत्तरे सरकारला द्यावी लागतात. आम्ही दोन्ही हात वर करून सरेंडर व्हायला तयार आहोत. तुम्ही आम्हाला जेलमध्ये घेऊन जा असं आव्हान शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी दिले.

दरम्यान, आंदोलन आता संपले नाही, असेच सुरू राहणार आहे. मैदान कुणीही सोडणार नाही. पाठ दाखवून कुणी जायचे नाही. कोटार्लाही निर्णय देताना जाण झाली पाहिजे. आजही आम्ही न्याय व्यवस्थेचा आदर करतो. पण न्याय व्यवस्था अशीच पुढे राहिली तर कोर्टासमोर आंदोलन उभं करावे लागेल. रोज शेतकरी मरतायेत त्यावर कुणी बोलत नाही. ज्या ताकदीने पोलीस येतील, त्या ताकदीने आम्ही शरण जाऊ. पोलिसांनी आम्हाला अटक करून दाखवावी असं बच्चू कडू यांनी सरकारला इशारा दिला.

### राजू शेट्टी काय म्हणाले ?

हा काही हिंदी चित्रपट नाही, बारा वाजता शेतकरी रेल्वे रुळावर गेले की लगेच तुमचा निरोप आला, बैठकीचं निमंत्रण देण्यासाठी मंत्री येत आहेत. आम्ही ते शेतकरी माघारी बोलावून घेतले. कोर्टानं काय ऑर्डर दिली आहे सरकारला माहिती होतं, कोर्टानं ऑर्डर सकाळी दिली होती, कोर्टाच्या कानात कुणी काय सांगितलं हे आम्हाला माहिती आहे, असं राजू शेट्टी म्हणाले. शेतकऱ्यांची चेष्टा चालवलीय का हे बरोबर नाही. सरकारचा हा डाव होता की शेतकऱ्यांनी आक्रमक व्हावं, कायदा हातात घ्यावा, हे आंदोलन चिरडावं असा सरकारचा डाव होता, असं राजू शेट्टी म्हणाले. तुम्ही चर्चेला तयार व्हावा हे सांगायला आलात पण कधी बैठक आहे तुम्हाला माहिती नाही, असं राजू शेट्टी म्हणाले. मीटिंगची तारीख तुम्हाला माहिती आहे का असा सवाल राजू शेट्टी यांनी आशिष जयस्वाल आणि पंकज भोयर यांना विचारला.

राज्यमंत्री पंकज भोयर यांनी सरकारच्या वतीनं आपल्याला नम्र विनंती करायला आलो आहे. सरकार आपल्यासोबत चर्चा करायला तयार आहे. चर्चेच्या माध्यमातून मार्ग निघेल, आपण वेळ द्यावी, चर्चेतून मार्ग निघेल. यावर बच्चू कडू यांनी दोन्ही मंत्र्यांना मुख्यमंत्र्यांशी बोला आणि फोन लावा आणि कर्जमुक्तीबाबत हो आहे की नाही याबाबत विचारा, असं म्हटलं.

बच्चू कडू यांच्यासोबत चर्चा करण्यासाठी राज्यमंत्री पंकज भोयर आणि राज्यमंत्री आशिष जयस्वाल दाखल झाले आहेत. बच्चू कडू यांनी यावेळी म्हटलं की आम्ही शांत बसलो की सरकार शांत होतंय. आम्ही जेलभरो करायला लागलो की तुम्ही लगेच आलात. आम्ही चार वाजता तुम्ही येणार यासाठी वाट पाहिली. सहा वाजता कोटार्चा आदेश आला तुम्ही यायला हवं होतं, आम्ही जेलभरो करायला गेलो तुम्ही आलात, असं बच्चू कडू म्हणाले. यावेळी राज्यमंत्री पंकज भोयर यांनी शेतकरी नेत्यांसोबत झालेल्या चर्चेनंतर सरकारनं केलेल्या विनंतीप्रमाणं बच्चू कडू आणि त्यांचे सहकारी मुख्यमंत्र्यांसोबत चर्चा करतील. या काळात आंदोलन शांततेत सुरु राहिल्यास कुठलाही त्रास प्रशासनाकडून होणार नाही, असं पंकज भोयर म्हणाले. तर, बच्चू कडू यांनी आंदोलन न थांबवता मुख्यमंत्र्यांसोबत चर्चा करणार असल्याचं म्हटलं. सरकारनं कर्जमुक्तीची तारीख सांगावी यासाठी लढा असल्याचं म्हटलं.

बच्चू कडू, राजू शेट्टी, कॉ. अजित नवले, महादेव जानकर आणि आशिष जयस्वाल, पंकज भोयर यांची भर पावसात चर्चा सुरु होती. यावेळी आशिष जयस्वाल यांनी सरकारसोबत चचेर्ला वेळ द्यावा, सरकार योग्य निर्णय घेईल, असं म्हटलं.

### शेतकरी नेते आणि मंत्र्यांमध्ये काय चर्चा ?

नेमकं काय चालू आहे, आम्ही काय घरच्यांसाठी आंदोलन करत नाही. हे तुम्ही बोलला होता, तुम्ही कर्जमाफीचं आश्वासन दिलं होतं. एमएसपीच्या 20 टक्के बोनस दिला होता. यावर्षी खरेदी देखील सुरु झाली नाही, गेल्या वर्षी ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात खरेदी सुरु झाली होती, असं बच्चू कडू म्हणाले.

# मोहोळ, माढ्यातलं ‘ऑपरेशन लोटस’ यशस्वी

### जिल्ह्याच्या राजकारणात मोठा धमाका

**मुंबई (कटूसत्य वृत):-** पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तोंडावरच सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणात मोठा धमाका केला आहे. मोहोळ,माढा तालुक्यातलं ऑपरेशन लोटस यशस्वीरित्या पूर्ण केलं आहे. या निमित्तानं पालकमंत्री जयकुमार गोरेंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना दिलेला शब्द पूर्ण केल्याचीही चर्चा आहे. मोहोळ, माढा या तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची मोठी ताकद उभी केलेल्या नेत्यांचा भाजप पक्षप्रवेश शरद पवारांच्या राजकारणालाच मोठा धक्का असल्याचं मानलं जात आहे.

मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन माजी आमदार आणि एका माजी आमदाराच्या दोन पुत्रांसह तब्बल 28 जणांचा बुधवारी (ता. 29 ऑक्टोबर) भारतीय जनता पार्टीत पक्षप्रवेश सोहळा पार पडला. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण,पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत मोहोळचे राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार राजन पाटील त्यांचे दोन्ही पुत्र विक्रांत पाटील व अजिंक्यराणा पाटील, माजी आमदार यशवंत माने, माजी आमदार बबनराव





### 'या' नेत्यांनी घेतलं कमळ हाती

राष्ट्रवादी काँग्रेसचे मोहोळ तालुकाध्यक्ष प्रकाश चवरे, जिल्हा उपाध्यक्ष दीपक माळी, जिल्हा कार्याध्यक्ष अस्लम चौधरी, जिल्हा बँकेचे संचालक भारत सुतकर, बाजार समितीचे सभापती धनाजी गावडे, उपसभापती प्रशांत बचुटे, जिल्हा परिषदेचे माजी सभापती जालिंदर लांडे, सज्जन पाटील, नागनाथ क्षीरसागर, सोमेश क्षीरसागर, माजी उपनगराध्यक्ष प्रमोद डोके, ॲड. राजाभाऊ पाटील, कुंदन धोत्रे, माजी सभापती रत्नमाला पोतदार, ज्योत्स्ना पाटील, सिंधू वाघमारे, यशोदा कांबळे, राहुल मोरे, बाळासाहेब भोसले, विश्वजित पाटील.

शिंदे यांचे दोन्ही पुत्र रणजितसिंह शिंदे व विक्रमसिंह शिंदे यांच्यासह गोरे यांच्या मान खटाव मतदारसंघातीलही काही जणांनी कमळ हाती घेतलं. यामुळे शरद पवारांच्या बालेकिल्ल्यात भाजपची मोठी ताकद वाढली आहे.

एकट्या मोहोळमधून राष्ट्रवादी काँग्रेसचे सुमारे दीड हजार नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते हे 367 वाहनांतून मुंबईकडे रवाना झाले होते. दरम्यान, मुंबईतील भाजपच्या प्रदेश कार्यालयातील पक्षप्रवेशाच्या सोहळ्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी भाजपात प्रवेश केलेल्या नेत्यांसाठी चहापानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी माजी आमदार राजन पाटील यांनी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यासमोरच मोठं विधान केलं. ते म्हणाले, आम्ही निष्ठेनं राहणारी माणसं आहोत, सत्तेसाठी संधी साधून पक्ष बदल करणारा आमचा वारसा नाही,विचार नाही.राजकीय वाटचाल नाहीये. म्हणून मी गेली 40 वर्षे मी ज्या पक्षात राहिलो.कुठल्याही सत्तेची अपेक्षा न करता राहिल्याचंही त्यांनी सांगितलं.

पाटील म्हणाले,आता येथून पुढे भाजपात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात देवाभाऊंच्या नेतृत्व कसं भक्कम होईल, भारतीय जनता पक्षाचा विचार शेवटच्या माणसापर्यंत कसा जाईल,हे मी आणि माझे कार्यकर्ते भाजपचा झेंडा घेऊन,रात्रीचा दिवस करुन,या जिल्ह्यातल्या लोकांचं मतपरिवर्तन करुन यापुढे ज्या ज्या निवडणुका होतील, त्यात एकटा भारतीय जनता पक्ष आपला झेंडा तिथं लावेल, असा शब्दही राजन पाटील यांनी यावेळी दिला.

आम्ही पक्ष बदलणारी माणसं नाही आहोत,शरीरात रक्ताचा थेंब आहे,तोपर्यंत आम्ही कमळ हाती घेऊन पक्षाचं काम करत राहू, अशी ग्वाही राजन पाटील यांनी यावेळी सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांना दिली.

राष्ट्रवादी काँग्रेसचे मोहोळचे माजी आमदार राजन पाटील,यशवंत माने आणि माजी आमदार बबनदादा शिंदे यांच्या दोन पुत्रांसह तब्बल 28 जणांचा भारतीय जनता पक्षात मुंबईत प्रवेश झाला.एकट्या मोहोळमधून राष्ट्रवादी काँग्रेसचे सुमारे दीड हजार नेते,पदाधिकारी आणि कार्यकर्ते हे 367 वाहनांतून मुंबईकडे रवाना झाले होते.

मोहोळचे माजी आमदार राजन पाटील, यशवंत माने यांच्या प्रवेशाच्या पार्श्वभूमीवर मतदारसंघातील भाजप नेत्यांसह पदाधिकाऱ्यांनी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची भेट घेतली होती. त्यांनी या प्रवेशाचे स्वागत केले. मात्र,यामुळे जुन्या भाजप कार्यकर्त्यांवर अन्याय होणार नाही, याची काळजी घेण्याची विनंती त्यांनी प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांना केली.त्याबाबत दक्षता घेतली जाईल; कोणावरही अन्याय होऊ देणार नाही, अशी ग्वाही चव्हाण यांनी नेत्यांसह पदाधिकाऱ्यांना दिली.यावेळी माजी जिल्हाध्यक्ष शंकर वाघमारे, सुशील क्षीरसागर,अंकुश अवताडे उपस्थित होते.

# निष्ठेला महत्व नाही तर मग सहकार परिषदचे अध्यक्ष कसे झालात?; उमेश पाटलांचा हल्लाबोल



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील काही नेत्यांनी भाजपमध्ये प्रवेश केलं आहे. त्यामुळे जिल्ह्यात अनेक चर्चा सुरु आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये निष्टेला महत्व नाही असं म्हटलं गेलं. पण मला या व्यक्तीची गंमत वाटते, असं म्हणत (पान 2 वर..)

### यशवंत माने यांना फारसं महत्व नाही, स्वतःची ग्रामपंचायतही त्यांच्या ताब्यात नाही

केवळ दोन माजी आमदारांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. त्यामुळं चार माजी आमदार म्हणून गफलत केली जात आहे. यशवंत माने हे सोलापूर जिल्ह्याचे नाहीत. ते व्यावसायिक आहेत ठेकदार आहेत. राजन पाटील याना वजा केलं तर यशवंत माने यांना फारसं महत्व नाही. स्वतःची ग्रामपंचायतही त्यांच्या ताब्यात नाही. त्यामुळं अशा माणसाच्या प्रवेशाला महत्व देण्याची आवश्यकता नसल्याची टीका उमेश पाटील यांनी यशवंत माने यांच्यावर केली. राजन पाटलांनी इंदापूरच्या माणसाला (यशवंत माने) आमचा तालुका ठेक्याने विकला होता. आता हा तालुका ठेकेदारीतून मुक्त झाल्याची टीका देखील उमेश पाटलांनी केली.

निरामय पॅरालिसिस सेंटर
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा ॲण्ड फिजिओथेरपी सेंटर
ISO 9001:2015
NGO
खात्रीशीर उपचार 100% गॅरंटी आयुर्वेदिक व अलोपॅथी तज्ञांच्या निगराणीमध्ये
कितीही जुने पॅरालिसिस असो आयुर्वेदिक व अलोपॅथी उपचार पद्धतीने पंधरा ते वीस दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे बेडवर आहात काळजी करू नका खात्रीशीर उपचार

नांत आपुलकीचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीचं आणि आधाराचं समाजातील प्रत्येक घटकाशी ऋणानुबंध जपणारी संस्था
मोबाईल नं. 9503310568
पत्ता: गोळवलकर हॉस्पीटल च्या पाठीमागे, सुळे नगर, मोहोळ, जि. सोलापुर

# उजनीतून यंदा शेतीसाठी तीनदा सुटणार पाणी; जानेवारीअखेर पहिले आवर्तन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** उजनी धरण सध्या ११० टक्के भरले असून, धरणात ११७ टीएमसी पाणी आहे. यंदा सोलापूर जिल्ह्यात सरासरीपेक्षा दुप्पट पाऊस झाला आहे. त्यामुळे यंदा शेतीसाठीचे पहिले आवर्तन २० जानेवारीनंतर सुटणार आहे.

त्यानंतर १ मार्च ते १५ जून या काळात दोनदा शेतीसाठी पाणी सोडले जाणार आहे. पण, पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत धरणातील पाण्याचे अंतिम नियोजन ठरणार आहे.

जिल्ह्यासाठी वरदायिनी असलेल्या उजनी धरणात सध्या दौंडवरून पाच हजार क्युसेकच्या विसगार्ने पाणी जमा होत आहे. त्यामुळे धरणातून आता



विद्युतनिर्मिती प्रकल्पासाठी १६०० क्युसेक आणि भीमा नदीतून १४०० क्युसेक पाणी सोडण्यात आले आहे. यंदाच्या पावसामुळे २० जूनपासून उजनीतून कालवा व भीमा नदीतून पाणी सोडण्यास सुरवात झाली. २००३ नंतर पहिल्यांदाच यंदा उजनीतील २१३ टीएमसी पाणी भीमा नदीतून सोडून देण्यात आले आहे. (पान 2 वर..)

विकणे /भाड्याने देणे आहे
वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.
संपर्क : डी. बी. शिंदे
मो.: ९५७९४२१४६५ ८२७५२७४२५३
पत्ता: अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

# सोलापुरात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान; मदतनिधी विलंबामुळे संतप्त शेतकरी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील ७ लाख ६४ हजार १७३ शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले. यासाठी राज्य शासनाकडून शेतकऱ्यांना ८६७ कोटी रुपयांचा मदतनिधीही मंजूर करण्यात आला आहे. मात्र आतापर्यंत केवळ १ लाख २२ हजार ४४० शेतकऱ्यांच्या बँक खात्यात मदतनिधी जमा झाला आहे. शेतकऱ्यांचा फॉर्मर आयडी नसणे, ई केवायसी नसणे आदी कारणामुळे शेतकऱ्यांना मदत मिळण्यात अडचण निर्माण होत



आहेत.

अतिवृष्टीमुळे सोलापूर जिल्ह्यातील शेतीचे नुकसान झालेल्या ७ लाख ६४ हजार १७३ शेतकऱ्यांसाठी राज्य शासनाकडून एकूण ८३७ कोटी ३७ लाख ६३ हजार रुपयांचा मदतनिधी मंजूर करण्यात आला आहे. यापैकी १ लाख २२ हजार (पान 2 वर..)

# शेतकऱ्यांना मदत पोहोचली नाही

## मंत्रिमंडळ बैठकीत तुफान राडा; मंत्री आणि अधिकाऱ्यांची खडाजंगी

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना महायुती सरकारने मोठा गाजावाजा करून 7 ऑक्टोबर रोजी 31 हजार 600 कोटींचे पॅकेज जाहीर केले. दिवाळीपूर्वी मदत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल असे आश्वासनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते.

मात्र दिवाळी संपली तरी शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा झालेले नाहीत. पैसा हातात नसल्याने शेतकऱ्यांची दिवाळीही यंदा अंधारात गेली. याचे तीव्र



पडसाद आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत उमटले. मंत्री आणि अधिकाऱ्यांची खडाजंगी झाली.

शेतकऱ्यांना अद्याप मदत का पोहोचली नाही याबद्दल अधिकाऱ्यांना जाब विचारण्यात आला. त्यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी आतापर्यंत किती मदत शेतकऱ्यांपर्यंत (पान 2 वर..)

## संपादकीय

# आता तरी वाद टाळा

देशाच्या निवडणूक आयोगाने 12 राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये 4 नोव्हेंबरपासून मतदार याद्यांचे शुद्धीकरण, म्हणजेच एसआयआर प्रक्रिया राबवण्याची घोषणा केली आहे. या योजनेनुसार ९ डिसेंबर रोजी प्रारूप मतदार यादी जाहीर केली जाईल आणि 7 फेब्रुवारीला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. ज्या राज्यात मतदार याद्यांचे हे शुद्धीकरण होणार आहे, त्यामध्ये गुजरात, मध्यप्रदेश, राजस्थान, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल अशा महत्त्वाच्या राज्यांचा समावेश आहे.

महाराष्ट्रात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्था होऊ घातल्याने तूर्त महाराष्ट्रात या टप्प्यात ही प्रक्रिया राबवली जाणार नाही. बिहारमध्ये केवळ एका महिन्यात प्रत्येक राज्यात ही मतदार यादी शुद्धीकरण प्रक्रिया राबवली जाईल. ही सगळी मोठी राज्ये आहेत. बिहारमध्येही इतक्या मोठ्या राज्यात केवळ एक महिन्यात संपूर्ण मतदार यादींचे शुद्धीकरण कसे होईल असा आक्षेप घेतला गेला होता, तोच प्रकार येथेही होताना दिसत आहे. उत्तर प्रदेशात बिहारपेक्षाही अधिक मतदार आहेत. तेथेही एका महिन्यात ही प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. त्यामुळे तेथेही वादाला मोठा वाव राहणार आहेच. पश्चिम बंगालमध्येही हीच स्थिती आहे.

ही सगळी प्रक्रिया केवळ एका महिन्यातच उरकण्याचा निवडणूक आयोगाचा हा आग्रह आहे असे आक्षेप आतापासूनच सुरू झाले आहेत. बिहारमध्ये जेव्हा ही एसआयआर प्रक्रिया राबवली गेली, त्यावेळी तब्बल 65 लाख मतदार वगळण्यात आले होते. त्यातून प्रचंड गदारोळ झाला. विरोधकांनी थेट संसदेत यावर आवाज उठवत संसदेचे संपूर्ण अधिवेशन दणाणून सोडले, तरीही निवडणूक आयोगाने आपली प्रक्रिया तशीच पुढे रेटली. त्यामुळे हा विषय सर्वोच्च न्यायालयात गेला आणि सर्वोच्च न्यायालयाने अनेक बाबींना आक्षेप घेत निवडणूक आयोगाला वठणीवर आणण्याचा प्रयत्न केला. आता पुन्हा असाच प्रकार या 12 राज्यांतही होणार आहे काय हा मुख्य प्रश्न आहे. मतदार याद्यांचे शुद्धीकरण करताना काही मूलभूत पथ्य पाळली पाहिजेत. यापूर्वी सन 2003 मध्ये पहिल्यांदा मतदार यादी शुद्धीकरण कार्यक्रम हाती घेतला गेला होता, पण त्यावेळी त्यासाठी काय निकष ठरवले त्याचे पत्रक दाबून ठेवले गेले. पण विरोधकांनी त्यावेळचे ते परिपत्रक मिळवले आणि बिहारमध्ये जी मतदार शुद्धीकरण प्रक्रिया राबवली गेली त्यात याचा अवलंब केला गेला नाही हे दिसून आले. 65 लाख मतदार वगळताना नेमके काय निकष लावले याविषयी वेगवेगळी माहिती प्रत्येक टप्प्यावर पुढे केली गेली.

या प्रक्रियेमध्ये निवडणूक आयोगाचा बीएलओ प्रत्येक घरी जाणे अपेक्षित आहे. त्याने स्वतः मतदार यादीत ज्यांची नावे आहेत ते हयात आहेत का आणि ते नोंदवले गेलेल्या पत्त्यावरच राहत आहेत का याची शहानिशा करणे अपेक्षित आहे. पण बिहारमध्ये बीएलओ घरापर्यंत गेलेच नाहीत, त्यांनी ऑफिसमध्ये किंवा घरी बसूनच मनमानी पद्धतीने ही यादी तयार केली. याचे स्टिंग ऑपरेशन एका वाहिनीने केले होते, ते खूप गाजले होते. पण यातल्या कुठल्याही आक्षेपाला धूप न घालता निवडणूक आयोग आपल्या पद्धतीनेच कार्यरत राहिला. शेवटी ज्या 65 लाख मतदारांची नावे वगळली गेली आहेत त्यांची डिजिटल यादी सर्व पात्रव्यवहार प्रकाशित करण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाला द्यावा लागला होता.

नुसती यादी जाहीर करून भागणार नाही तर संबंधित मतदारांची नावे का वगळली याचे कारणही तेथे नमूद करावयास सांगितले गेले होते.

आता हा सगळा मागचा अनुभव पाहता 12 राज्यांत ही जी शुद्धीकरण प्रक्रिया राबवली जाणार आहे त्यात कुठेही शंकेला वाव राहणार नाही याची काळजी घेण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाची आहे. ही शुद्धीकरण प्रक्रिया राबवताना नेमके कोणते निकष लावले जाणार आहेत आणि प्रक्रिया नेमकी कशा पद्धतीने पार पडणार आहे याची सगळी माहिती निवडणूक आयोगाने आत्ताच दिली पाहिजे. मतदार यादीमध्ये कसा घोळ होतो याचे पुराव्यासह सादरीकरण अलीकडेच रोहित पवार आणि आदित्य ठाकरे यांनी सर्वांच्या पुढे केले आहे.

कोणाचेही बनावट आधार कार्ड तयार करणे सहज शक्य आहे आणि त्या आधारे कुठल्याही मतदारसंघात मतदार नोंदणी करणे पण शक्य आहे हे रोहित पवार यांनी पुराव्यासह दाखवून दिले होते. त्यावेळी त्यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्या नावाने आधार कार्ड काढून त्यांची मतदार म्हणून नोंदणी केली होती आणि हे प्रात्यक्षिक त्यांनी सर्वांच्या पुढे सादर केले होते. त्यामुळे नव्याने होणारी एसआयआर प्रक्रिया निर्धोक असावी यासाठी निवडणूक आयोगाला प्रत्येक पातळीवर काळजी घ्यावी लागणार आहे. प्रख्यात निवडणूक तज्ज्ञ योगेंद्र यादव यांचे असे म्हणणे आहे की ही नवीन प्रक्रियाही सुरक्षित नाही, उलट नेम धरून ठराविक मतदार, मतदार यादीतून काढण्यासाठी निवडणूक आयोग आता शार्प शूटर पद्धत अवलंबणार आहे.

ही मतदार शुद्धीकरण प्रक्रिया नसून नागरिकांचे नागरिकत्व तपासण्याची प्रक्रिया आहे असेही योगेंद्र यादव यांचे म्हणणे आहे. त्यामुळे यातील प्रत्येक आक्षेपाला निवडणूक आयोगाने नेमकेपणाने उत्तर देऊन त्याबाबत काय दक्षता घेतली जाणार आहे याचा खुलासा जनतेपुढे वेळीच करायला हवा. निवडणूक प्रक्रिया निष्पक्षपणे आणि पारदर्शीपणे पार पाडणे ही निवडणूक आयोगाची प्राथमिक जबाबदारी आहे. देशात लोकशाही टिकवण्यासाठी ते अत्यंत आवश्यक आहे. बिनदिक्कतपणे कोणाचेही नाव वगळायचे आणि कोणाचेही नाव त्या ठिकाणी घालायचे असला प्रकार निदान यावेळी तरी व्हायला नको.

# शाळांचे व्यावसायिकरण व राजकारण झाल्याने देशातील ८ हजार शाळा रिकाम्या!

देशात २० हजार शिक्षक फुकट पगार घेतात ही बाब खरी आहे यात दुमत नाही.परंतु याला जबाबदार कोण? याचा विचार राजकीय पुढाऱ्यांनी व सरकारने प्रथम करायला पाहिजे. कारण याचे खरे दोषी देशातील ९८ टक्के राजकीय पुढारी व राजकारणी आहेत.देशातील राजकीय पुढाऱ्यांनी आपल्या मुलांना कधीतरी सरकारी शाळांमध्ये टाकण्याचा प्रयत्न केला का? यांचाही अभ्यास राजकीय पुढाऱ्यांनी करावा.राजकीय पुढारी आपले मुल विदेशात शिक्षणासाठी पाठवितात आणि १४० कोटी जनतेला ग्याण सांगतात.म्हणजे "लोका सांगे ब्रह्मज्ञान आणि स्वतः कोरडे पाषाण".देशातील प्रत्येक राज्यांनी सरकारी शाळांकडे जातीने लक्ष दिले असते तर विद्यार्थी जास्तीत जास्त व शिक्षक कमी पडले असते.परंतु अशा योजना राजकीय पुढाऱ्यांना परवडणाऱ्या नसतात. कारण त्यांना आम जनतेशी, पालकांशी व विद्यार्थ्यांशी काहीही देणेघेणे नसते.राजकिय पुढारी आपली तिजोरी कशी भरता येईल याकडे जातीने लक्ष देतात.याच हेतुने देशात खाजगी शाळांचा जन्म झाला आणि या संपूर्ण शाळा-महाविद्यालये जास्तीत जास्त राजकीय पुढाऱ्यांचे असल्याचे दिसून येते ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.त्यामुळे देशातील ८ हजार शाळा रिकाम्या व २० हजार शिक्षक फुकटचा पगार घेतांना दिसतात. याला जबाबदार शाळा किंवा शिक्षकांना धरता येणार नाही तर याला मुख्य जबाबदार आहेत आजचा राजकीय पुढारी त्यामुळेच त्यांच्या जवळ आज गडगंज संपत्ती दिसून येते. आपल्याला आणखी एक उदाहरण देता येईल, देशात सर्वात मनाने आणि मालमत्तेने श्रीमंत आपला शेतकरी आहे.परंतु यांना गरीबांच्या खाईत लोटण्याचे काम राजकीय पुढाऱ्यांनी केले. आज शेतकरी श्रीमंत असुन सुद्धा पैशांनी गरीब आहे आणि राजकीय पुढारी काही नसुन सुध्दा करोडपती आहेत हे कृषिप्रधान देशाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.पुर्वी देशात सरकारी शाळांशिवाय पर्याय नव्हता. सरकारी शाळांमध्ये दिले जाणारे शिक्षण अत्यंत मोलाचे आणि महत्वाचे होते.कारण पुर्वी प्रत्येक शिक्षक जिव लावून शिकवायचे आणि त्यातूनच देशातील विद्वान, साहित्यीक, सैनिक, शास्त्रज्ञ, सायंटिस्ट, लेखक, पत्रकार अशाप्रकारे मोठमोठे विद्वान तयार व्हायचे.परंतु गेल्या २० वर्षापासून निव्वळ शिक्षणाचा बाजार मांडल्याचे दिसून येते.यामुळे देशातील संपूर्ण शाळांची परिस्थिती दिवसेंदिवस ढासळतांना दिसून येते.याला मुख्य कारण म्हणजे शिक्षण क्षेत्रात वाढता राजकीय हस्तक्षेप. आज आपण पहातो की देशातील अनेक राज्यांमध्ये शिक्षण संस्था राजकीय पुढाऱ्यांच्या आहेत.यामुळे या राजकीय पुढाऱ्यांनी शिक्षणाचे निव्वळ राजकारण केल्याचे दिसून येते.कारण शिक्षण क्षेत्रातील वाढती चढाओढ पाहून राजकीय पुढाऱ्यांनी या क्षेत्राताचा सटीक फायदा घेतला व घेत आहेत.याचे जिवंत उदाहरण म्हणजे आज देशातील प्रत्येक खाजगी शाळा - महाविद्यालय, कॉन्व्हेन्ट यांनी विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्या दरम्यान पालकांकडून मोठ्या प्रमाणात फी व डोनेशन वसुल करतात व ज्या पध्दतीने फीस व डोनेशन वसुल करतात त्याच पद्धतीने स्टॅण्डर्ड मेंटेनन्स करतात हे संपूर्ण पालकांच्या पैशांवर करतात.परंतु या शिक्षणाच्या व्यवसायिकरणाचा देशातील संपूर्ण सरकारी शाळा -महाविद्यालयांवर विपरीत परिणाम होत आहे आणि याचेच मुख्य कारण म्हणजे देशातील आठ हजार शाळा रिकाम्या आहेत व २० हजार शिक्षक घेताहेत फुकटचा पगार आणि या संपूर्ण गोष्टींना जबाबदार आहेत आजची शिक्षण प्रणाली. सरकारने जर सरकारी शाळा -महाविद्यालयांना प्रोत्साहन देऊन त्यांचा योग्य तो दर्जा वाढविला असता व शक्ती निशी प्रयत्न केले असते तर आज खाजगी शाळा-महाविद्यालयापेक्षा सरकारी शाळांचे शिक्षण उच्च दजार्चे रहाले असते व २० हजार शिक्षकांना फुकटचा पगार देण्याची पाळी आली नसती हेही तितकेच सत्य आहे. परंतु राजकीय पुढाऱ्यांचे खिशे भरण्याच्या दृष्टीने सरकार खाजगी शाळा-महाविद्यालयाना जास्त प्रोत्साहित करीत आहे ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे असे मला वाटते. शिक्षण मंत्रालयाच्या आकडेवारीत स्पष्ट सांगितले आहे की, देशभरातील जवळपास ८ हजार शाळांमध्ये २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात एकाही विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेला नाही, या शुन्य प्रवेश असलेल्या शाळांमध्ये तब्बल २०८१७ शिक्षक कार्यरत आहेत, म्हणजे एवढे शिक्षक फुकटचा पगार घेत आहेत.याचा गांभीयार्ने अभ्यास सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी करणे गरजेचे आहे.आपण शिक्षकांना फुकटचा पगार घेतात असे म्हणतो हे ठीक आहे.परंतु देशातील आमदार-खासदार-मंत्री कोणती मेहनत करतात हेही तर फुकटचा पगार घेतात हे तर समाजसेवा करायला निघाले यांना कशाला हवा पगार,भत्ते? पुवीर्चे राजकीय पुढारी खरोखरच सेवाभावी वृत्तीचे होते व त्यांच्या सेवाभावी वृत्तीमुळे देशातील संपूर्ण शाळा सुरळीत चालायच्या व शिक्षक सुध्दा सेवाभावीने विद्यार्थ्यांना शिकवायचे आणि त्यातूनच विद्यार्थी घडायचे व यातुनच आपला देश सुध्दा घडला.परंतु आजच्या राजकीय पुढाऱ्यांमध्ये सेवाभावी वृत्ती मुळातच रहाली नाही हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.त्यामुळे सरकारने शाळांना किंवा शिक्षकांना दोष देण्यापेक्षा राजकीय पुढारी काय करीत आहे आणि ते खरोखरच सरकारी शाळांना प्रोत्साहन देतात का याकडे सरकारने जातीने लक्ष देण्याची गरज आहे.जय हिंद.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

प्रबोधन

# शहाणे करीती । मनाचा अभ्यास मन म्हणजेच आत्मा

इजिप्त देशातील भव्य पिरॅमिड्स ही जगातील आश्चर्ये म्हणून ओळखली जातात. मात्र पिरॅमिड्स ही थडगी आहेत हे बऱ्याच पर्यटकांना माहीत नसतं. या पिरॅमिड्सचा आणि थडग्यांचा अभ्यास करण्यात आयुष्य खर्च केलेल्या सर ऑर्थर कीथ या संशोधकाने एवढ्या दीर्घ संशोधनानंतर असं सिद्ध केलं आहे की, प्राचीन इजिप्तवासीयांना आत्मा अमर असतो या कल्पनेची जी भुरळ पडली, तीच या पिरॅमिड् सची आणि सुंदर थडग्यांची आधारशिला आहे.

भारतातही प्रसिद्ध थडगी खूप आहेत. पण इजिप्तच्या लोकांनी भारतीय लोकांच्या आत्म्याचं अमरत्व मानण्यावर ताण करणारी अद्भूत कृती केली आहे. त्यांनी मृत व्यक्तीबरोबर त्याच्या सर्व राण्या, दास- दासी, मांजर-कुत्री सारं सारं बंदिस्त करून अनेकांचा प्राणनाश केला आहे. शिवाय त्या मृतात्म्यासाठी अन्न, पाणी, व्यसनाची साधनं, ऐषआरामाच्या वस्तू सारे ठेवण्याची दक्षता घेतली आहे. या सर्व खटाटोपाचा सामान्य अर्थ काढला, तरी एखादा चुकीचा विचार कसा अनेकांचा बळी घेतो ते समजून वाईट वाटतं. पिरॅमिड हजारो वर्षे राहातील, पर्यटकांना काही भव्य पाहिल्याचा आनंद देतील. पण ज्या दुर्दैवी जीवांचे बळी सक्तीने घेतले गेले, त्या क्रूर कृत्याची दुर्गंधी विचारींना त्याहून अधिक काळ बेचैन करीत राहील. आत्म्याच्या अमरत्वाचं विष किती जालीम आहे हे सत्य, समजून घेणाऱ्याच्या अंगावर भीतीने काटा आणणारं आहे. हा आत्मा आहे तरी काय? हे समजून घेतल्याशिवाय, त्याविषयीची भीती दूर होणार नाही. माणसाच्या शरीरात आत्मा असतो आणि माणसाच्या शरीरात मनही असतं तर मन वेगळं आणि आत्मा वेगळा असतो काय? स्वामी विवेकानंद म्हणतात, 'जेव्हा तुमचं मन आवरलं जाईल तेव्हा तुमचं शरीरही तुमच्या ताब्यात येईल. त्यावेळी या शरीररूपी यंत्राच्या आधीन न होता तुम्ही त्याच्यावर प्रभुत्व मिळवाल. तेव्हा हे शरीररूपी यंत्र आत्म्याला खाली ओढण्याऐवजी ते त्याचं फार मोठं साहाय्यक बनेल.' ब्रिटिश तत्त्वज्ञ ब्रॅडले म्हणतात, 'We have defined the soul as a series of psychical events.' अर्थात, मनाच्या अगणित व्यापारांची साखळी म्हणजेच आत्मा. म्हणजेच मन आणि आत्मा यात फरक नसून दोन्ही एकच आहेत.

प्रा. मा. का. देशपांडे आत्मा ह्या शब्दावरच आक्षेप घेतात. आत्मा म्हणजे प्रचंड थोतांड असं ठामपणे सांगताना ते लिहितात, 'वेदांताच्या आत्माविषयक कल्पनेला जोरदार विरोध करणारे बंडखोर नास्तिक आपल्याकडे आहेतच. ते मायावादाची हेटाळणी प्रथमपासून करतात. ब्रह्माची कल्पना त्यांना केवळ कल्पनाच वाटते. आत्म्याचं अस्तित्व ते मान्य करीत नाहीत आणि त्याच्या अमरत्वाची कल्पना त्यांना हास्यास्पद वाटते. त्याचप्रमाणे आत्म्याची बद्धता आणि मुक्तता या भाकडकथा वाटतात. मानवाला फक्त मन आहे आणि त्याच्याच परवानगीने सर्व क्रिया चालतात, असं ते सांगतात.'

याविषयी चार्वाकाचा एक विचार चिंतनीय आहे. ते म्हणतात, 'जर हा निघालेला आत्मा परलोकास जात असेल, तर आप्तजन आणि संबंधी यांच्या स्नेहाने व्याकुळ होऊन तो परत का येत नाही?' गौतम बुद्ध मृत्यूशय्येवर पडले असताना अमरत्वाच्या कल्पनेचा त्यांनी शिष्यासमोर मृदू भाषेत उपहास केला आहे. मन चिंती ते वैरी न चिंती अशी म्हण आहे. ती शंभर टक्के खरी आहे, पण वेगळ्या अर्थाने. आत्म्याची कल्पना करून मनाने स्वतःशीच वैर मांडलं आहे. म्हणूनच शहाणी माणसं आपल्या मनाला सुखी होण्याचा हितोपदेश करतात आणि आत्मा नावाच्या जंगलात ते शिरणार नाही, याची काळजी सतत घेतात. लक्षात ठेवा,

आत्मा तेचि मन । मन तोचि आत्मा
भेद नये कामा । दोहोंमध्ये ॥ १
आग तेचि धग । धग तीच आग।
नाही वेगळीक । दोहोमध्ये ॥ २
देहाचे चैतन्य । नामे मन- आत्मा ।
चैतन्याची सीमा । त्याच्यासाठी ॥ ३
जुने नाव आत्मा । लबाडांनी दिले।
लुबाडण्या केले । गारूडास ॥४
आत्म्याच्या नावाने । समाजा लुटले ।
शोषकांचे झाले । महालाभ ॥५
शहाणे करीती । मनाचा अभ्यास
गूढतेचा नाश । करुनिया ।। ६
मनाला योग्य ते । लाविती वळण ।
करीती कल्याण । आयुष्याचे ॥७
शरीर मरता । आत्मा मरतसे ।
भटांचे होतसे । तरी हित ॥८
आत्मा अमर ही। उठविती हूल ।
पाडतात भूल । अज्ञ लोका ॥ ९
मरोत ते भट । जळो त्यांचे ज्ञान ।
जुनाट अज्ञान। सोडा आता ॥ १०



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# माळशिरस तालुक्यातील शेकडो कार्यकर्त्यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश

**नातेपुते (कटूसत्य वृत):-** माळशिरस तालुक्यातील शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेना एकनाथ शिंदे गटामध्ये जाहीर प्रवेश करून भगव्या विचारधारेचा अंगीकार केला आहे.

महाराष्ट्र राज्याचे विद्यमान उपमुख्यमंत्री शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर आणि विकासाभिमुख कार्यपद्धतीवर विश्वास ठेवून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे माळशिरस तालुका उपाध्यक्ष तुषार वाघमोडे पाटील, तसेच पिरळे गावचे माजी सरपंच अशोक तोडकर, दत्ताभाऊ रुपनवर, तसेच गुरु कर्चे, अखिल सूळ, आप्पा चव्हाण, माऊली चव्हाण, हितेश लोहार, नवनाथ खिलारे, रुपेश राऊत यांचे सह असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेनेचा भगवा स्वीकारला.



या पक्ष प्रवेशामुळे तालुक्यात शिवसेनेची प्रचंड ताकद वाढल्याने कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह, नवी ऊर्जा संचारली आहे. याप्रसंगी शिवसेना नेते तथा माजी गृहराज्य मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख महेश साठे, युवासेना जिल्हाप्रमुख प्रियदर्शन साठे,माळशिरस तालुकाप्रमुख सतीश सपकाळ,शेतकरी सेनेचे तालुकाध्यक्ष अर्जुन पिसाळ, कार्यप्रमुख महादेव तुपसौंदर, तालुका उपप्रमुख तानाजी भोळे, सुनील साठे, नातेपुते शहर प्रमुख पै.निखिल पंलगे, अकलूज शहर प्रमुख महेश पवार,सोशल मिडिया विधानसभा प्रमुख सुनील ढोबळे, सोशल मीडिया तालुकाप्रमुख अमोल साठे, मारुती मेटकरी, माजी सैनिक दादासाहेब केंगार, संदिप फुले, संजय दणाणे सह पदाधिकारी, युवा कार्यकर्ते व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रवेशामुळे माळशिरस तालुक्यात राजकीय समीकरणांमध्ये मोठे बदल होणार असल्याचे मत

## शेतकऱ्यांना मदत पोहोचली...

पोहोचली याचा अहवाल तातडीने सादर करा, असे निर्देश मुख्य सचिव राजेश कुमार यांना दिले.

अतिवृष्टीमुळे मराठवाडा, सोलापूर व अन्य भागांतील शेतकऱ्यांची पिके आणि संसार वाहून गेले, शेतातली जमीन खरडून गेली, विहिरी गाळाने भरल्या. विरोधी पक्षांनी शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई मिळावी यासाठी जोरदार पाठपुरावा केल्यानंतर महायुती सरकारने मदतीचे पॅकेज जाहीर केले, परंतु घोषणेनंतर आज वीस दिवस उलटल्यानंतरही बहुतांश शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहोचलेली नाही. कुठे पंचनामे अडलेत तर कुठे निकषांवरून अधिकारी अडवणूक करत असल्याच्या लोकप्रतिनिधींच्या तक्रारी आहेत.

मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज याच मुद्दयावरून मंत्र्यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले. शेतकऱ्यांच्या खात्यात अद्याप पैसे पोहोचलेले नाहीत अशा सर्वपक्षीय आमदारांच्या तक्रारी आहेत. त्याबद्दल अधिकाऱ्यांना जाब विचारण्यात आला. त्यावर अधिकारी निरुत्तर झाले. बहुतांश शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे पाठवण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्याचा दावा अधिकाऱ्यांकडून करण्यात आला. अधिकाऱ्यांचा तो कावा मुख्यमंत्री फडणवीस यांच्या लक्षात येताच आजपर्यंत किती शेतकऱ्यांच्या खात्यात किती पैसे जमा झाले त्याचा अहवाल तातडीने सादर करण्याचे आदेश त्यांनी मुख्य सचिवांना दिले.

### शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात

दिवाळीपूर्वी नुकसानभरपाईची रक्कम खात्यात आली तर त्यातून तरी दिवाळीत दिवे लावता येतील अशा आशेवर शेतकरी होते. पण ही जबाबदारी ज्या अधिकाऱ्यांवर होती ते दिवाळीत सलग पाच दिवस सुट्टीवर होते. परिणामी दिवाळीतही शेतकऱ्यांना पैसे मिळाले नाहीत आणि त्यांची दिवाळी अंधारात गेली.

पान १ वरून

## निष्ठेला महत्व नाही तर मग...

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे सोलापूर जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी माजी आमदार राजन पाटील यांच्यावर टीका केली. निष्ठेला महत्व नाही म्हणता मग सहकार परिषदचे अध्यक्ष कसे झालात? असा सवालही उमेश पाटील यांनी केला. मला आता भाजपमध्ये बेशिस्त होणार नाही याची काळजी लागली आहे. जगातला पृथ्वीतलावरचा चांगला माणूस घेतलाय असा टोला देखील उमेश पाटलांनी राजन पाटील यांना लगावला.

### तुमच्याकडे सगळं असताना लोकांनी तुम्हाला का नाकारलं?

राजन पाटील हे लोकानेते होते, पण त्यांनी आत लोकमत गमावलं आहे. माझा लहान माणूस म्हणून उल्लेख करतात. हो मी लहान आहे. कारण माझ्याकडे साखर कारखाना, शिक्षणसंस्था, बँका ताब्यात नहीत. पण तुमच्याकडे सगळं असताना लोकांनी तुम्हाला का नाकारलं? असा टोला देखील उमेश पाटलांनी राजन पाटलांना लगावला. ते आज भाजपमध्ये गेलेत त्यामुळे आता आम्हाला त्यावर काही बोलायचं नाही, त्यांना आमच्या शुभेच्छा आहेत असे उमेश पाटील म्हणाले. राजन पाटलांच्या एका मुलाने आठ महिन्यापूर्वीच भाजपत ऑनलाईन प्रवेश केला आहे. त्यामुळं उगाच माझ्यावर खापर फोडून फायदा नाही. तुम्ही जिल्हा भाजपमय करणार म्हणता तुम्ही तुमचा तालुका टिकवू शकला नाही, असा टोला देखील उमेश पाटलांनी लगावला.

### भाजप स्वतंत्र लढणार असेल तर आम्ही शिंदे गटासोबत काही ठिकाणी तर काही ठिकाणी स्वतंत्र लढू

बबनदादा शिंदे यांच्या मुलाने सांगितलं आहे की वडिलांना विचारुन केलं आहे. पण याबाबत बबनदादा शिंदे यांची कुठलीही प्रतिक्रिया आलेली नाही. हा तांत्रिक विषय असल्याचे उमेश पाटील म्हणाले. भाजपच्या आमदारांनी स्वबळाचं नारा दिलाय आहे. आम्ही एकत्रित लढण्याचा विचार करत होतो. पण भाजपचा विचार एकटं लढण्याचा असेल तर मग आम्ही शिंदे गटासोबत काही ठिकाणी तर काही ठिकाणी स्वतंत्र लढू असे उमेश पाटील म्हणाले.

### राजन पाटलांकडून भाजपचे लोकं शिव्या शिकतील

जर आम्ही खोट बोलणारे असतो तर लोकांनी आम्हाला निवडून दिलं नसतं असे उमेश पाटील म्हणाले. तालुक्यातील लोकं यांच्या गुंडगिरी कंटाळली होती. शिस्तप्रिय असलेल्या पक्षात ही गुंडगिरी चालणार आहे का? असा सवाल करत उमेश पाटील यांनी राजन पाटील यांच्यावर टीका केली. इतका विद्वान माणूस पक्षात घेतलाय, त्याला रामभाऊ म्हाळगी प्रबोधनीचा प्राचार्य केलं पाहिजे. शिव्यावर पुस्तक लिहिणारा हा माणूस आहे, त्याच्याकडून भाजपचे लोकं शिव्या शिकतील अशी टीका उमेश पाटील यांनी केली आहे.

लग्नाच्या आधी मुलं कसं जन्माला घालतात? याची माहिती केवळ राजन पाटील आणि त्यांच्या मुलांनाच आहे. त्यामुळं इतका विद्वान माणूस त्यांनी पक्षात घेतला आहे असे पाटील म्हणाले.

### झोपेच सोंग घेणाऱ्यांना कसं उठवणार?

एकमेकांचे कार्यकर्ते ओढून घेतलेलं राज्य पाहत असतं. त्याचे लोण राज्यभर पुन्हा पसरेल. लोकांना हा प्रवेश आवडला की नाही हे निवडणुका नंतर समजेल असे उमेश पाटील म्हणाले. जायचं ज्यांनी ठरवलं आहे त्यांना थांबवन शक्यच नसतं. झोपेच सोंग घेणाऱ्यांना कसं उठवणार? असा सवाल देखील पाटील यांनी केला. चार महिने आधीच यांनी पक्ष सदस्य घेतलेलं होतं असे पाटील म्हणाले.

## उजनीतून यंदा...

जिल्हाभर अतिवृष्टी झाली, पूर आला. त्यामुळे या वर्षी शेतीसाठी रब्बी हंगामात जानेवारीपर्यंत तरी पाणी सोडावे लागणार नाही, अशी सद्य:स्थिती आहे. यंदा १ फेब्रुवारी ते १५ जून या काळात जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी एकूण तीन आवर्तने सोडली जातील, असे लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

### एका आवर्तनासाठी किती लागते पाणी?

शेतीसाठी रब्बी हंगामात शक्यतो जानेवारीत पहिले आवर्तन सोडले जाते. त्यावेळी कडक उन्हाळा सुरू झालेला नसतो म्हणून सहा टीएमसी पाणी लागते. पण, मार्चनंतर एप्रिल-मे महिन्यात शेतीसाठी कालव्यातून आवर्तन सोडण्यासाठी दोन टीएमसी अतिरिक्त म्हणजेच आठ टीएमसी पाणी सोडावे लागते. तर सोलापूर शहरासाठी भीमा नदीतून दरवर्षी तीन ते चार वेळा पाणी सोडावे लागत होते. त्यासाठी प्रत्येक आवर्तनावेळी पाच टीएमसी पाणी सोडावे लागते. पण, आता समांतर जलवाहिनीतून पाणी उपसा सुरू झाल्याने सोलापूरसाठी नदीतून पाणी सोडणे बंद होणार आहे.

## सोलापुरात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे...

४४० शेतकऱ्यांच्या बँक खात्यात १४० कोटी ७९ लाख ४० हजार रुपये निधी जमा झाला आहे.

जिल्ह्यातील ४ लाख २६ हजार २९५ शेतकर्यांचे एकूण ५०९ कोटी ८४ लाख रुपयांचा मदतनिधी तहसील पातळीवरुन मंजूर करण्यात आला असून यानिधीचे वितरण बँक खात्यात सुरु असल्याचेही जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले. अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांची यादी पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे, असेही यावेळी सांगण्यात आले.

अतिवृष्टी व पूरग्रस्तांना मदत वाटप करताना बाधित शेतकऱ्यांचा फॉर्मर शेतकऱ्यांना मदत लवकर वितरीत आयडी असणे आवश्यक आहे. होईल. फॉर्मर आयडी नसलेल्या जिल्ह्यातील ७० टक्के शेतकऱ्यांकडे शेतकऱ्यांना मात्र ई केवायसी फॉर्मर आयडी आहेत. त्यामुळे केल्यानंतरच मदतनिधी मिळणार असल्याचेही प्रशासनाकडून सांगण्यात आले.

राज्य शासनाने दिवाळीपूर्वी बाधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात मदत निधी देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र दिवाळी सरल्यानंतरही सात लाखापैकी केवळ एक लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यात मदत निधी आल्याने शेतकऱ्यांकडून ओरड होत आहे.

शेतकऱ्यांना मदतनिधी वाटप करताना ई केवायसी किंवा फॉर्मर आयडीची सक्ती करण्यात येणार नाही, असेही आश्वासन राज्य शासनाकडून देण्यात आले होते. मात्र मदतनिधी बाटपात पारदर्शकता निर्माण होण्यासाठी फॉर्मर आयडी किंवा ईकवायसी आता शेतकऱ्यांसाठी बंधनकारक करण्यात आली आहे. त्यामुळे अशा शेतकऱ्यांना मदतनिधी मिळण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत.

### वात्रटिका

**कार्टून करमणूक**

नाकोंडा,अजगर नंतर
डोरेमॉन नोबिता आले...
राजकारणात प्राणी घुसले
उंदरासह त्याचे कार्टून झाले...
जुगलबंदीचा यांचा खेळ रोज.
जणू जोकराची वागणूक...
आवडीने रंगले लोक सारे
त्यांचीही होते करमणूक...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# 'लाडकी बहीण योजने'च्या लाभार्थ्यांनी मुदतीत ई-केवायसी पूर्ण करावी- आदिती तटकरे



**मुंबई (कटूसत्य वृत):-** 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' या योजनेमध्ये पारदर्शकता येण्यासाठी व लाभार्थ्यांना नियमितपणे आर्थिक लाभ मिळावा याकरीता https://ladakibahin.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ई-केवायसी ची सुविधा 18 सप्टेंबर पासून दोन महिन्याच्या कालावधी करीता उपलब्ध करण्यात आली आहे. ई-केवायसी ची प्रक्रिया अत्यंत सोपी व सुलभ असून आत्तापर्यंत अनेक लाभार्थ्यांनी ई-केवायसी ची प्रकिया यशस्वी पूर्ण केली आहे . इतर लाभार्थ्यांनी ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना ई-केवायसी प्रक्रियेबाबत येणाऱ्या समस्यांवर उपाययोजनाबाबत आज मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या.

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांचे ई-केवायसी माध्यमातून आधार प्रमाणीकरण केले जात आहे. ही प्रक्रिया अतिशय सोपी व सुलभ असून, महिला स्वतःच्या मोबाईलवरूनही ही प्रक्रिया कमी वेळात पुर्ण करू शकतात. ज्यांनी अद्याप ई-केवायसी केली नाही त्यांनी 18 नोव्हेंबर पर्यंत ही प्रक्रिया पुर्ण करावी.

# वळसंग पोलिसांची मोठी कारवाई

## तिल्ल्याळ येथे तीन ठिकाणी हातभट्टी दारूवर छापा



**सोलापूर (कटूसत्य वृत):-** सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या पथकाने वळसंग पोलीस ठाणे हद्दीत मौजे तिल्ल्याळ येथे तीन ठिकाणी हातभट्टी दारू तयार करणाऱ्या भट्ट्यांवर छापा टाकून कारवाई केली आहे.

ही कारवाई अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण, प्रीतम यावलकर, अप्पर पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी अक्कलकोट उपविभाग विलास यामावर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

या मोहिमेत सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल डोंगरे, पोलीस उपनिरीक्षक रविराज कांबळे, तसेच पोलीस हवालदार श्रीशैल माळी, सुनील कुवर, अशोक पाटील, दर्याप्पा व्हाणमोरी आणि संतोष कुंभार यांनी सहभाग घेतला.

छाप्यात एकूण १,४०० लिटर गुळमिश्रित रसायन आणि बॅरलसह ₹५०,४०० किमतीचा मुद्देमाल, तसेच ७० लिटर तयार हातभट्टी दारू (किंमत अंदाजे ₹७,०००) जप्त करण्यात आली. या प्रकरणी तीन आरोपींवर गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू आहे.

# सोमेश यावलकर यांच्या वाढदिवसानिमित्त सांगोल्यात जनकल्याणकारी उपक्रम



**सांगोला (कटूसत्य वृत):-** सांगोला शहरातील नागरिकांसाठी समाजहिताचा एक उपक्रम राबविण्यात येत आहे.

मा.आमदार शहाजीबापू यांचे एकनिष्ठ व विश्वासू सहकारी मा.नगरसेवक सोमेश यावलकर यांच्या वाढदिवसानिमित्त सांगोला शहरातील महिला व पुरुष यांच्यासाठी विविध शासकीय सेवा मोफत उपलब्ध करून देण्याची योजना त्यांच्या मित्रपरिवाराच्या वतीने सुरू करण्यात आली आहे.

हा उपक्रम शुक्रवार, ३१ ऑक्टोबर ते रविवार, २ नोव्हेंबर या तीन दिवसांदरम्यान सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळेत रेशन धान्य दुकान शेजारी, वज्राबाद पेठ, सांगोला येथे होणार आहे.

या उपक्रमांतर्गत आयुष्मान भारत कार्ड, लाडकी बहीण e-KYC कागदपत्रे, आधारकार्ड दुरुस्ती तसेच नवीन आधारकार्ड काढणे या महत्त्वाच्या सेवा नागरिकांना एका ठिकाणी सुलभपणे मिळणार आहेत.

आयुष्मान भारत कार्डसाठी 70 वर्षावरील वृद्धांना रेशनकार्ड व आधारकार्डच्या आधारे कार्ड मिळणार आहे.

लाडकी बहीण योजनेसाठी लाभार्थ्यांनी स्वतःचा आधारकार्ड, आधार लिंक असलेला मोबाईल क्रमांक तसेच वडिलांचे आधारकार्ड किंवा विवाहित महिलांनी पतीचे आधारकार्ड सादर करणे आवश्यक आहे. तसेच आधारकार्ड दुरुस्तीसाठी मतदान कार्ड, डोमिसाइल किंवा मॅरेज सर्टिफिकेट आवश्यक राहणार आहे.

नवीन आधारकार्ड बनविण्यासाठी ५ वर्षांतील जन्मदाखला तसेच पालकांचे आधारकार्ड आवश्यक आहे.

रुग्ण सेवा असो की जनतेची विविध माध्यमातून सेवा करणे तसेच सर्वसामान्यांच्या हाकेला मदतीसाठी धावून जाणे हाच एकमेव ध्येय मनाशी बाळगून सांगोला शहरातील समाजकारणात नेहमीच अग्रेसर असणारे व

आज सांगोल्यातील नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करणारे, नवनवीन उपक्रम राबवणारे आणि सर्वांचा विश्वास संपादन करणारे युवा नगरसेवक म्हणून मा.नगरसेवक सोमेश यावलकर यांचे नाव आदराने घेतले जाते.सदर उपक्रमाचे संयोजन नगरसेवक सोमेश यावलकर मित्र परिवाराने केले असून, नागरिकांना आवश्यक कागदपत्रांसह वेळेत हजेरी लावून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून व मा.नगरसेवक सोमेश यावलकर यांचेकडून करण्यात आले आहे.

### जनसेवेचा नवा चेहरा- मा.नगरसेवक सोमेश यावलकर

सांगोला शहराच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणारे मा. नगरसेवक सोमेश यावलकर हे आज शहरातील तरुण नेतृत्वाचे प्रेरणास्थान ठरले आहेत.सामाजिक बांधिलकी, जनसंपर्क आणि तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचून काम करण्याची त्यांची कार्यशैली ही त्यांच्या लोकप्रियतेचे मुख्य कारण ठरली आहे.त्यांच्या वाढदिवसानिमित्त नेहमीप्रमाणे उत्सव न साजरा करता, समाजोपयोगी कार्य करण्याची परंपरा त्यांनी जपली आहे. वृद्ध, महिला, वंचित घटक आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी आरोग्य, कागदपत्रे व शासन योजनांचा लाभ सहज मिळावा यासाठी ते कायम पुढाकार घेत असतात.त्यामुळे आश्वासक चेहरा म्हणून ते सांगोला शहरासह तालुक्यात सध्या प्रसिद्ध होत आहे.

# 'स्वच्छ व हरित विद्यालय मूल्यांकन' उपक्रम राबविणार राज्यातील सर्व शाळा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील सर्व शाळा स्वच्छ, हरित आणि आनंददायी वातावरण निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने 'स्वच्छ आणि हरित विद्यालय मूल्यांकन उपक्रम' राबविण्याचे निर्देश दिले आहेत. या उपक्रमामुळे राज्यातील सर्व शाळा स्वच्छतेच्या आणि पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकणार आहेत.

या उपक्रमामागचा उद्देश शाळांमध्ये नियमित स्वच्छता राखणे, विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत सकारात्मक सवयी विकसित करणे, तसेच शाळा परिसरात हरित वातावरण टिकवून ठेवणे हा आहे. पर्यावरण संवर्धनाबरोबरच सर्वसमावेशक आणि आनंददायी शालेय वातावरण निर्माण करण्यासाठी हा उपक्रम प्रभावी ठरणार आहे.

'स्वच्छ आणि हरित विद्यालय मूल्यांकन २०२५-२६' हा उपक्रम पूर्वीच्या 'स्वच्छ विद्यालय पुरस्कार' योजनेच्या धर्तीवर अधिक व्यापक आणि सर्वसमावेशक स्वरूपात राबविण्यात येणार आहे. मूल्यांकनासाठी सहा प्रमुख विषयांवर आधारित ६० प्रश्नांचा समावेश असून, शाळांना स्वयंमूल्यांकनाद्वारे सुधारणा करण्याची संधी दिली जाणार आहे.

या मूल्यांकन उपक्रमात सर्व प्रकारच्या शाळांचा -शासकीय, खासगी अनुदानित, खासगी, निवासी, आदिवासी, अल्पसंख्याक तसेच केंद्रीय विद्यालय, नवोदय विद्यालय आणि केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न शाळांचा- सहभाग अनिवार्य असेल.

या उपक्रमामुळे सोलापूरसह राज्यातील सर्व शाळा स्वच्छ, हरित आणि पर्यावरणपूरक होण्याच्या दिशेने वाटचाल करतील, असा विश्वास जिल्हा शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष अनिरुद्ध पवार यांनी व्यक्त केला.

# दूषित पाण्यामुळे मैंदर्गीतील नागरिक गॅस्ट्रोच्या विळख्यात



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** मैंदर्गी नगरपरिषदेच्या हलगर्जीपणामुळे सुभाष गल्ली परिसरातील नागरिकांना दूषित पाणीपुरवठा झाल्याने गॅस्ट्रोची लागण झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या परिसरातील सुमारे ३० ते ४० घरांतील नागरिक आजारी पडले असून अनेकांना उलट्या, जुलाब, मळमळ व तापाचा त्रास होत आहे.

मैंदर्गी शहरात सध्या एक दिवसाआड पाणीपुरवठा केला जातो. मात्र सुभाष गल्ली व कमळावेस परिसरात कमी दाबाने पाणी येत असल्याने नागरिकांनी नळधारकाजवळ खड्डे करून पाणी घेण्याची पद्धत सुरू केली आहे. त्यामुळे ड्रेनेजमधील दूषित पाणी पाईपलाईनमध्ये मिसळून पाणीपुरवठा दूषित झाल्याचे स्पष्ट झाले आहे.घटनेची माहिती मिळताच प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. मंजुनाथ पाटील यांनी घटनास्थळी भेट देऊन ६० ते ७० रुग्णांवर प्राथमिक उपचार केले. अनेक घरांमध्ये जाऊन तपासणीही करण्यात आली. काही रुग्णांना अक्कलकोट व सोलापूर येथे पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

या वेळी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अर्जुन सुरवसे तसेच कर्मचारी उपस्थित राहून नागरिकांना 'पिण्याचे पाणी उकळून प्यावे' असे आवाहन केले. दूषित पाण्याचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत.घटनास्थळी माजी नगराध्यक्ष तुकप्पा नागूर, माजी नगरसेवक संजय मोरे व सिद्धाराम जमादार तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांनी तातडीने उपचारकार्य केले.नागरिकांनी नगरपालिकेला खड्डे बुजवून स्वच्छ व सुरळीत पाणीपुरवठा करण्याची मागणी केली आहे.

## जाहिर प्रसिध्दीकरण
अर्ज नं.१८९/२०२४

**मोहोळ येथील मे.तहसिलदार सो. यांचे समोर**

श्री. विजय शत्रुघ्न काटे, वय-६१ वर्षे,धंदा-शेती, रा.पाटकुल, ता.मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर. } अर्जदार

**विरूध्द**

१)मा.निवासी नायब तहसिलदार सो.तहसिल कार्यालय मोहोळ. २)मा.ग्रामविकास अधिकारी पाटकुल, ता.मोहोळ, (अर्जाची नोटीस ग्रामसेवक ग्रामपंचायत, पाटकुल, यांचेवर बजावविण्यात यावी.) } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदाराचे चुलत आजोबा म्हणजेच जिना नागु महार (काटे) यांचा मृत्यु ता.१०/०९/१९४४ रोजी मौजे पाटकूल, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सन १९४४ साली ग्रामपंचायत अस्तित्वात नसल्यामुळे सदर सामनेवाला नं.१ यांचेकडे अर्जदाराचे चुलत आजोबा म्हणजेच जिना नागु महार (काटे) यांच्या मृत्यु दाखल्याची ता.१०/०९/१९४४ रोजीप्रमाणे मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला नं.१ यांनी त्यांच्याकडील माहे सप्टेंबर १९४४ चे अभिलेखात अर्जदाराचे चुलत आजोबा म्हणजेच जिना नागु महार (काटे) यांची मृत्यु नोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या मे. कोर्टात सामनेवाला नं.२ यांचेकडील अभिलेखात मृत्युची नोंद घेणेबाबत आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.२१/११/२०२५ रोजी किंवा ही नोटीस प्रसिध्द केल्यापासुन १५ दिवसाचे आत समक्ष अथवा वकीलामार्फत मे.कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणीप्रमाणे मृत्यु दाखला देणेबाबत सामनेवाला नं.२ यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्यानिशी दिले असे. ता.१८/१०/२०२५

(शिक्का)

सही/-
तहसिलदार
तहसिल कार्यालय, मोहोळ

# शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी माजी नगरसेवकाची निर्दोष मुक्तता- ॲड. मिलिंद थोबडे



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अक्कलकोट नगर परिषदेतील स्वच्छ भारत अभियानाचे काम करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यास शिवीगाळ, मारहाण करून शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी अक्कलकोट नगर परिषदेचे माजी नगरसेवक उत्तम शेकाप्पा गायकवाड रा. भिमनगर अक्कलकोट यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली.

यात हकीकत अशी की, अक्कलकोट नगर परिषदेतील तत्कालीन संगणक अभियंता भालचंद्र सदानंद उंबरजे यांना दि. 19/12/2015 रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कर्मचारी विठ्ठल तेली व सुधाकर माळवदकर यांचेसह स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत प्राप्त झालेल्या अजार्ची स्थळपाहणी करून तपासणी करण्याचे आदेश दिल्याने ते सर्वजण भीम नगर अक्कलकोट येथील घरांची तपासणी करत बुद्ध विहार जवळ गेले असताना तत्कालीन नगरसेवक उत्तम गायकवाड यांनी भालचंद्र उंबरजे यांना पाहुन तुम्ही शासकीय काम व्यवस्थित करत नाही असे म्हणून शिवीगाळ करून त्यांच्या शटार्ची कॉलर पकडून हाताने मारहाण केली व धमकावले अशा आशयाची फिर्याद भालचंद्र उंबरजे यांनी दाखल केल्यावरुन शासकीय कामात अडथळा आणल्याचा गुन्हा अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा तपास तत्कालीन पोलीस हवालदार रामू पवार यांनी करून मे. न्यायालयात दोषारोप दाखल केले होते.

खटल्याचे सुनावणीत सरकार पक्षातर्फे एकूण 4 साक्षीदार तपासण्यात आले.

खटल्याचे अंतिम सुनावणीवेळी आरोपीतर्फे ॲड. मिलिंद थोबडे यांनी आपल्या युक्तिवादामध्ये सरकार पक्षातर्फे फियार्दी व इतर साक्षीदार हे कर्तव्य बजावत असल्याचा कोणताही पुरावा देण्यात आलेला नाही, तथाकथित घटना पाहणारा कोणीही स्वतंत्र साक्षीदार नाही व फिर्याद देण्यास झालेल्या विलंबाचे कारण देण्यात आलेले नाही असे मुद्दे मांडले, ते ग्राह्य धरून मे. जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. आर जे कटारिया यांनी आरोपीची निर्दोष मुक्तता केली.

यात आरोपी तर्फे ॲड. मिलिंद थोबडे, ॲड. राजकुमार मात्रे यांनी तर सरकार पक्षातर्फे ॲड प्रकाश जन्नू यांनी काम पाहीले.

## जाहिर प्रसिध्दीकरण
जन्म मृत्यु नोंद
अर्ज नं. ३००/२०२५.

**मोहोळ येथील मे.तहसिलदार सो. यांचे कोर्टात**

बिलाल हमीद उर्फ हमीदसो मुजावर, वय-३८ वर्षे, धंदा-व्यवसाय,रा.महिबुब नगर,मोहोळ, ता.मोहोळ, जि. सोलापूर. } अर्जदार

**विरूध्द**

मोहोळ नगरपरिषद, मोहोळ, ता.मोहोळ, (अर्जाची नोटीस मुख्याधिकारी नगरपरिषद, मोहोळ, ता.मोहोळ, यांचेवर बजावविण्यात यावी). } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांनी त्यांचा जन्म ता.०२/०६/१९८७ रोजी मौजे मोहोळ ता. मोहोळ, जि. सोलापूर येथे झाला आहे. परंतु त्यांच्या जन्माची नोंद मौजे मोहोळ ता. मोहोळ येथील सामनेवाला यांचे कार्यालयामध्ये जन्म-मृत्यु रजिष्टरला जन्म तारखेपासुन एक महिन्याचे आत करणे आवश्यक होते. परंतु अर्जदाराचे वडिल मजुरी कामानिमीत्त बाहेरगांवी असल्यामुळे अर्जदार यांच्या जन्माची नोंद करु शकले नाहीत. त्यामुळे सदरची नोंद करण्याचा आदेश सामनेवाला यांना व्हावा अशी मागणी अर्जदाराने मे. कोर्टात सदरचा अर्ज दाखल करुन केलेली आहे.

त्याअर्थी तमाम लोकांस सदर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की, वर नमुद केल्याप्रमाणे अर्जदार यांचा दि.०२/०६/१९८७ रोजी जन्म झाल्यामुळे त्यांच्या जन्माची नोंद मोहोळ ता. मोहोळ येथील सामनेवाला यांचे जन्म-मृत्यु रजिष्टरला रेकॉर्डवर घेण्यास कोणाचीही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांचे आत अगर सदर अर्जाचे कांमी नेमलेली तारीख २४/११/२०२५ रोजी आपली तक्रार/हरकत स्वतः अगर वकिलामार्फत या मे. कोर्टात सादर करावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास कायदेशीर बाबींचा विचार करुन सामनेवाला यांना अर्जदार यांचा जन्म दि.०२/०६/१९८७ रोजी झाल्याची नोंद घेण्याचा आदेश करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही हरकत चालणार नाही, याची नोंद घ्यावी. हे जाहिर प्रसिध्दीकरण दिले असे. ता. २९/१०/२०२५.

(शिक्का)

सही/-
तहसिलदार
तहसिल कार्यालय, मोहोळ

## जाहिर प्रसिध्दीकरण
जन्म मृत्यु नोंद
अर्ज नं. ३९३/२०२५.

**मोहोळ येथील मे.तहसिलदार सो. यांचे कोर्टात**

अझरुद्दिन हमीद उर्फ हमीदसो मुजावर, वय-४१ वर्षे, धंदा-व्यवसाय,रा.महिबुब नगर,मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर. } अर्जदार

**विरूध्द**

मोहोळ नगरपरिषद, मोहोळ, ता.मोहोळ, (अर्जाची नोटीस मुख्याधिकारी नगरपरिषद, मोहोळ, ता.मोहोळ, यांचेवर बजावविण्यात यावी). } सामनेवाला

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांनी त्यांचा जन्म ता.२०/१२/१९८४ रोजी मौजे मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर येथे झाला आहे. परंतु त्यांच्या जन्माची नोंद मौजे मोहोळ ता. मोहोळ येथील सामनेवाला यांचे कार्यालयामध्ये जन्म-मृत्यु रजिष्टरला जन्म तारखेपासुन एक महिन्याचे आत करणे आवश्यक होते. परंतु अर्जदाराचे वडिल मजुरी कामानिमीत्त बाहेरगांवी असल्यामुळे अर्जदार यांच्या जन्माची नोंद करु शकले नाहीत. त्यामुळे सदरची नोंद करण्याचा आदेश सामनेवाला यांना व्हावा अशी मागणी अर्जदाराने मे. कोर्टात सदरचा अर्ज दाखल करुन केलेली आहे.

त्याअर्थी तमाम लोकांस सदर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की, वर नमुद केल्याप्रमाणे अर्जदार यांचा दि. २०/१२/१९८४ रोजी जन्म झाल्यामुळे त्यांच्या जन्माची नोंद मोहोळ ता. मोहोळ येथील सामनेवाला यांचे जन्म-मृत्यु रजिष्टरला रेकॉर्डवर घेण्यास कोणाचीही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांचे आत अगर सदर अर्जाचे कांमी नेमलेली तारीख २५/११/२०२५ रोजी आपली तक्रार/हरकत स्वतः अगर वकिलामार्फत या मे. कोर्टात सादर करावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास कायदेशीर बाबींचा विचार करुन सामनेवाला यांना अर्जदार यांचा जन्म दि.२०/१२/१९८४ रोजी झाल्याची नोंद घेण्याचा आदेश करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही हरकत चालणार नाही, याची नोंद घ्यावी. हे जाहिर प्रसिध्दीकरण दिले असे. ता.२९/१०/२०२५.

(शिक्का)

सही/-
तहसिलदार
तहसिल कार्यालय, मोहोळ

# किसन जाधव आणि नागेश गायकवाड यांच्या प्रयत्नातून प्रभाग २२ येथे रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचे शुभारंभ



**सोलापूर (कटूसत्य वृत):-** सोलापूर महानगरपालिका प्रभाग क्रमांक २२ येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना अंतर्गत सन २०२३- २४ अंतर्गत राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांच्या सहकार्यतून राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव आणि कार्यसम्राट नगरसेवक नागेश गायकवाड यांच्या प्रयत्नातून ११लाख २८,५८८ खर्चित सोनी नगर मोदी हुडको येथील रस्ता कॉंक्रिटीकरण कामाच्या शुभारंभ करण्यात आला.

दरम्यान यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पाटीर्चे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांच्या नेतृत्वाखाली या कामाचे धार्मिक विधिवत पूजन होऊन शुभारंभ करण्यात आला यावेळी हरीश तेलगू, सिद्राम वाडेकर, आमिर तांबोळी, फैयाज शेख, धनंजय नगरकर, जनार्दन कांबळे, गणेश दुगाने, मधुकर कश्यप, माणिक बेळं, विकी संगटे, आदिल भाई मुल्ला, मुन्ना कोळूर, वसंत गोरे, यलगुंडे मावशी, सविताताई बंगाली नागम्मा बेडरू, शकुंतला चिंतलवार, अंबिका म्हेत्रे, राबिया शेख, शारदा माशाळकर, मीनाक्षी म्हेत्रे, रेणुका म्हेत्रे, पद्माताई गोरे, नीलम गोरे, अनिता भंडारे यांच्यासह प्रभागातील तसेच या परिसरातील नागरिकांची मोठे उपस्थिती होती.

दरम्यान चांगले रस्ते असल्याने वाहतूक कमी होईल आणि वायू प्रदूषण कमी होईल ज्यामुळे नागरिकांचे आरोग्य सुधारेल चांगले रस्ते असल्याने व्यवसाय आणि उद्योगांना फायदा होईल ज्यामुळे आर्थिक विकास होईल चांगले रस्ते असल्याने नागरिकांना येण्या जाण्याची सुविधा होईल आणि त्यांचा वेळ देखील वाचेल रस्ते विकास कामामुळे नागरिकांना उच्च दर्जाचे जीवन मिळणार आहे चांगले रस्ते असल्याने अपघाताचे पण कमी होईल आणि नागरिकांची सुरक्षितता नक्कीच वाढेल रस्ते विकास कामामुळे नागरिकांना उच्च दर्जाचे रस्ते मिळणार असल्याने त्यांना अनेक फायदे होतील नागरिकांना चांगल्या सुविधा मिळावा यासाठी प्रभाग क्रमांक २२ येथे रस्ता कामाचा कॉंक्रिटीकरण करणे शुभारंभ करण्यात आला नागरिकांना अतिउच्च दर्जाचे सुविधा मिळावे या उद्देशाने हे काम हाती घेण्यात आले आहे असे यावेळी या रस्ते कॉंक्रिटेकंड शुभारंभ प्रसंगी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव म्हणाले.

प्रभाग क्रमांक २२ च्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून या पुढील काळात देखील प्रभाग 22चा सर्वांगीण विकास होईल अशी ग्वाही देखील यावेळी उपस्थित नागरिकांना किसन जाधव यांनी दिलं.

## निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय

**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-

8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)

## अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी


प्रोप्रा. हरी सुभाष विरपे

9822964815
9421984815

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) उमेदवाराचा आश्वासनांचा जाहीरनामा २) दुष्काळात प्रत्येकाला रोजगार मिळण्यासाठी शासन चालवत असलेली योजना-**** ** योजना ३) लाभ, उपयुक्त ४) नशीब (हिंदीत) ५) राहुल गांधी यांच्या बहिणीचे नाव ६) स्त्रियांना कपाळभर लावलेले कुंकू ७) येणाऱ्या काळात ११) गडबड, धांदल १२) भय, भीती (हिंदीत) १३) फटाक्यांची माळ १५) विमान उतरण्याची जागा १८) मुख्याध्यापक २०) हात, टॅक्स २१) बाहेरच्या विरूध्दार्थी २३) दुप्पट (इंग्रजीत) २४) मजबूत, कणखर २५) विचार, निर्धार (हिंदीत) २९) एक जगप्रसिध्द धरण कालवा ३०) सायकलचे चाक ३१) मत देण्याची क्रिया ३२) कामाचा मिळणारा आर्थिक मोबदला ३४) सलमान खानच्या बंधूचे नाव ३५) मराठी चित्रपटसृष्टीतील एक अभिनेता-*** भावे ३८) मनसे अध्यक्ष-** ठाकरे ३९) दु:ख (हिंदीत) ४०) कावळ्याचे ओरडणे **काव ४२) याच्या पिठापासून चपाती अथवा पोळी करतात

**आडवे शब्द :** १) खा. राहुल गांधी यांचे भाजपमध्ये असलेले चुलतबंधू २) आमदार असलेले पवारांचे नातू-*** पवार ५) पंकजा मुंडे यांच्या खासदार असलेल्या बहिणीचे नाव ७) एक हिंदी भाषिक न्यूज चॅनल ८) तीन गुणिले तीन ९) छ. शिवरायांना राज्याभिषेक करणारे धर्मगुरू-** भट्ट १०) गायीचे वासरू १३) छगन भुजबळ यांचे एक पुतणे १४) भारतीय क्रिकेट संघातील एक माजी खेळाडू -** शास्त्री १६) नाला १७) सासरच्या विरूध्दार्थी १९) पाकचा एक माजी फलंदाज-इंझमाम उल ** २१) दंगल चित्रपटातील प्रमुख अभिनेता २२) पुसटच्या विरूध्दार्थी २५) बिल्डिंग (मराठीत) २६) याच्यावर भाकरी भाजतात २७) णब उलट लिहा २८) बरोबर, योग्य २९) वास, गंध ३२) धनी ३३) दरवाजा ३४) उमेदवाराने डिपॉझिट म्हणून भरलेली रक्कम (मराठीत) ३५) मुलाची पत्नी ३६) कपडे धुण्याची प्रसिध्द पावडर ३७) रामदास स्वामींनी लिहिलेला ग्रंथ ३८) क्रोध, संताप ४०) श्रवणेंद्रिय ४१) मेंढीपालन करणारा समाज, सरकारने यांच्या आरक्षणाचा प्रश्न प्रलंबित ठेवला आहे ४३) वस्तूंची एकत्र केलेली जुळवाजुळव ४४) तूप (हिंदीत)

## सुडोकु - 90

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 1 | | | | | 4 | 2 | 7 |
| | | | | | 3 | 9 | 1 | 5 |
| 2 | 5 | 4 | 7 | | | 6 | 8 | |
| 4 | 7 | | | 8 | 6 | | 3 | 2 |
| | 6 | | 4 | | | | | 8 |
| 5 | | | | 1 | 2 | | 6 | |
| 3 | 4 | | 6 | 2 | | | | 1 |
| | | | 3 | | | | | |
| | 2 | 6 | | | 8 | | | 9 |

# राष्ट्रवादी आगामी निवडणुका महाविकास आघाडी म्हणून लढणार



**सोलापूर (कटूसत्य वृत):-** आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाची मुंबईत महत्त्वाची बैठक पार पडली. पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी ही बैठक घेतली असून, या बैठकीला सोलापूर जिल्ह्यातील तीन आमदार अनुपस्थित होते.

माळशिरसचे आमदार उत्तमराव जानकर हे न्यायालयीन कामकाजासाठी दिल्लीला गेले होते. आमदार राजू खरे हे आजारी असल्याने गैरहजर राहिले, तर आमदार नारायण पाटील यांनी पूर्वपरवानगी घेऊन बैठकीस अनुपस्थित राहिल्याची माहिती खासदार धैर्यशील मोहिते पाटील तसेच पक्षाचे जिल्हाध्यक्ष वसंतनाना देशमुख यांनी दिली. माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांची सोलापूरच्या प्रभारीपदी नियुक्ती झाली आहे. या बैठकीला पक्षाच्या कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्ष शशीकांत शिंदे, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, सोलापूर जिल्ह्याचे प्रभारी माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, आमदार एकनाथ खडसे, माजी मंत्री बाळासाहेब पाटील, आमदार जितेंद्र आव्हाड, आमदार अभिजित पाटील, जिल्हाध्यक्ष वसंतनाना देशमुख, कार्याध्यक्ष रवी पाटील, माजी महापौर अॅड. यु. एन. बेरिया, माजी शहराध्यक्ष भारत जाधव, महेश गादेकर, महेश गाडेकर आदी मान्यवर उपस्थित होते. अधिक माहिती देताना वसंतनाना देशमुख म्हणाले, स्थानिक पातळीवर आघाडी करताना सक्षम पक्षाला सोबत घ्यावे. आघाडीचे अधिकार स्थानिक नेत्यांना देण्यात आले आहेत. ज्या ठिकाणी उद्धवसेना सक्षम असेल, त्या ठिकाणी उद्धवसेनासोबत आघाडी करा. तसेच ज्या ठिकाणी काँग्रेस सक्षम असेल, त्या ठिकाणी काँग्रेससोबत आघाडी करा,अशी सूचना शरद पवार यांनी दिली आहे. मनपा, नगरपालिका तसेच जिल्हा परिषदेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर रविवार, २ नोव्हेंबर रोजी मोहोळ येथे प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात येणार असून, त्याची तयारी सुरू असल्याचेही देशमुख यांनी सांगितले.

पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी आणि स्थानिक आघाड्यांच्या तयारीसाठी शरद पवार यांनी मार्गदर्शन केले. देशमुख म्हणाले, ‘ज्या ठिकाणी उद्धवसेना सक्षम असेल, तिथे उद्धवसेनासोबत, आणि जिथे काँग्रेस सक्षम असेल, तिथे काँग्रेससोबत आघाडी करा.’

सोशल मीडियावर मात्र चर्चा रंगली की, बैठकीला उपस्थित असलेले महेश गाडेकर हे पूर्वी भाजप कार्यकर्ते होते. या वादावर शहराध्यक्ष सुधीर खरटमल यांनी प्रतिक्रिया देत सांगितले की, ह्लतो सध्या आमच्या पक्षाचा कार्यकर्ता आहे आणि पक्षासाठी काम करतो.ह्वयेत्या २ नोव्हेंबर रोजी मोहोळ येथे प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक होणार असून, त्याची तयारी सुरु असल्याचे वसंतनाना देशमुख यांनी सांगितले.

# शहर गुन्हे शाखेकडून ०१,०८,०००/- रू. किंमतीचा एम.डी. अंमली पदार्थ जप्त



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरामध्ये अंमली पदार्थ खरेदी-विक्री करणाऱ्या इसमांचा शोध घेवून त्यांचेवर कठोर कारवाई करणेबाबत एम. राज कुमार, पोलीस आयुक्त सोलापूर शहर, डॉ. अश्वीनी पाटील, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, सोलापूर शहर यांनी गुन्हे शाखेकडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनामार्गदर्शन करून आवश्यक त्या सुचना दिल्या होत्या.त्याअनुषंगाने, दिनांक २८/१०/२०२५ रोजी गुन्हे शाखेकडील नेमणूकीस असलेले ग्रेडपोसई शामकांत जाधव, पोह/बापु साठे व त्यांचे तपास पथक अवैध अंमली पदार्थ खरेदी-विक्री करणारे इसमांवर कारवाई करणेकरीता शहर हद्दित पेट्रालिंग करीत असताना त्यांना गोपनिय बातमी प्राप्त झाली की, " एक इसम सोलापूर एस.टी.स्टँड परिसरामध्ये Mephedrone (एम.डी.) अंमली पदार्थ विक्री करण्यासाठी येणार आहे". प्राप्त बातमी अरविंद माने वरिष्ठ पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा यांना अवगत करून त्यांचे सूचनेप्रमाणे व मार्गदर्शनाखाली ग्रेपोसई शामकांत जाधव व तपास पथक असे सोलापूर एस.टी. स्टँड परिसरामध्ये गेले. त्या ठिकाणी त्यांनी प्राप्त बातमीचे अनुषंगाने पाहणी केली असता एक इसम संशयास्पद स्थितीत थांबल्याचे दिसून आले. त्यावेळी त्यास शिताफीने ताब्यात घेवून त्याचे नाव-पत्ता विचारून त्याची अंगझडती घेतली असता त्याचे पँटचे खिशामध्ये एका प्लास्टीक पाऊचमध्ये पांढ्या रंगाची Mephedrone (एम.डी.) सदृश्य पावडर मिळून आली. म्हणून तात्काळ पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर कडील फॉरेन्सिक टिमला पाचारण करून सदर पावडरची रासायनीक तपासणी केली असता सदरची पावडर ही Mephedrone (एम.डी.) अंमली पदार्थ असल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून नमूद इसम नामे- मोहमद अझहर हैदरसाहेब कुरेशी, वय ३७ वर्षे रा.१३३८/३ भिमपुरा लेन, सेंटर स्ट्रीट कॅम्प, पुणे यास ताब्यात घेवून त्याचेकडे अधिक चौकशी केली असता त्याने Mephedrone (एम.डी.) अंमली पदार्थ सोलापूर शहरामध्ये विक्री करीता घेवून आल्याचे सांगितले. त्यानंतर नमूद इसमाविरूध्द फौजदार चावडी पोलीस ठाणे, सोलापूर शहर येथे गुरनं ७५२/२०२५ एन.डी.पी.एस. अॅक्ट कलम ८ (क), २२ (ब), २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमूद गुन्ह्याचा तपास गुन्हे शाखेकडील सहा. पोलीस निरीक्षक दत्तात्रय काळे हे करीत आहेत.

तपासामध्ये आरोपी नामे- मोहमद अझहर हैदरसाहेब कुरेशी याने सदरचा अंमली पदार्थ हा मुंबई येथून घेवून आल्याचे निष्पन्न झाले असून त्या दृष्टीने पुढील तपास / कारवाई चालू आहे. सदरची कामगिरी एम. राज कुमार, पोलीस आयुक्त सोलापूर शहर, डॉ. अश्वीनी पाटील, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे /वि.शा.), राजन माने, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली अरविंद माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, स.पो.नि. दत्तात्रय काळे, ग्रे.पो.स. ई. शामकांत जाधव व त्यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार बापू साठे, सैपन सय्यद, वसिम शेख, सुभाष मुंढे, अनिल जाधव, कुमार शेळके, मच्छिंद्र राठोड व प्रकाश गायकवाड यांनी केली आहे.

# कूर्मदास साखर कारखान्याचा गळीत हंगाम शुभारंभ

## कामगारांना १५ दिवसांचा बोनस जाहीर



**माढा (कटूसत्य वृत्त):-** श्री संत कूर्मदास सहकारी साखर कारखान्याच्या २०२५-२६ च्या सोळाव्या गळीत हंगामाचा शुभारंभ चिंचगाव टेकडी येथील स्वामी शिवचरणानंद सरस्वती महाराज यांच्या हस्ते झाला. या वेळी कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार अॅड. धनाजीराव साठे आणि उपाध्यक्ष सुधीर पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमात श्री सत्यनारायण आणि काटा पूजन हा विधी कारखान्याचे संचालक मधुकर चव्हाण व त्यांच्या पत्नी जयश्रीताई चव्हाण यांच्या हस्ते संपन्न झाला. तसेच श्री संत कूर्मदास महाराज, सहकारमहर्षी स्व. गणपतराव साठे आणि लोकनेते स्व. विलासराव देशमुख यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

प्रास्ताविकात संचालक दादासाहेब साठे म्हणाले की, "कारखाना चालविताना काही अडचणी निर्माण होतात, परंतु सभासद शेतकऱ्यांच्या विश्वासाने आणि सहकार्याने कूर्मदास कारखाना सातत्याने प्रगतीच्या मार्गावर आहे." चालू हंगामासाठी ३.५० लाख मेट्रिक टन गाळपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, त्यासाठी यंत्रणा सज्ज असल्याचे त्यांनी सांगितले.

अलीकडील सीना नदीच्या पुरामुळे ऊसपिकाचे मोठे नुकसान झाले असून, अशा ऊसाला गाळपात प्राधान्य देण्यात येणार असल्याचे साठे यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांनी नोंदवलेला सर्व ऊस कारखान्याला द्यावा, असे आवाहन त्यांनी केले. कामगारांच्या प्रोत्साहनासाठी संचालक मंडळाने १५ दिवसांच्या पगाराइतका बोनस जाहीर केला आहे. तसेच गाळपदराच्या बाबतीत परिसरातील इतर कारखान्यांच्या तोडीस तोड दर देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला संचालक बी. डी. पाटील, भालचंद्र पाटील, हरिदास खताळ, राहुल पाटील, विजयसिंह पाटील, मधुकर चव्हाण, नारायण गायकवाड, शालिनी कदम, संध्याराणी खरात, संजय इंगळे, कमल लोंढे, भाऊसाहेब लोंढे, धनाजी खरात, नगराध्यक्षा मुनलताई साठे आणि उपनगराध्यक्षा कल्पनाताई जगदाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

# आयुक्त डॉ. ओंबासे यांनी सार्वजनिक शौचालयांची केली पाहणी



**सोलापूर (कटूसत्य वृत):-** सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज शहरातील विविध सार्वजनिक शौचालयांना भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. या पाहणीदरम्यान मधुकर उपलप वस्ती, रामवाडी, मोदी, कुंभार गल्ली आणि लष्कर या परिसरांतील सार्वजनिक स्वच्छतागृहांची स्थिती तपासण्यात आली.

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने सार्वजनिक स्वच्छालयांच्या दुरुस्ती व देखभाल कामांना वेग देण्यात आला असून, त्या अनुषंगाने आयुक्तांनी स्वत: प्रत्यक्ष स्थळभेट देऊन सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला. या वेळी त्यांनी सफाई कामगार वेळेवर उपस्थित राहतात का, पाण्याचा पुरवठा नियमित आहे का, पाण्याचे टँकर वेळेवर पोहोचतात का, तसेच शौचालयांची स्वच्छता नियमित केली जाते का याबाबत सविस्तर माहिती घेतली. ड्रेनेज लाईन चोकअप होणार नाही याबद्दल विभागीय अधिकारी यांनी तत्काळ दुरुस्ती करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या.

पाहणीदरम्यान डॉ. ओम्बासे यांनी निर्देश दिले की, ज्या सार्वजनिक शौचालयांचे दरवाजे तुटलेले आहेत, पाण्याच्या टाक्या खराब झालेल्या आहेत किंवा पाण्याची व्यवस्था सुरळीत नाही, अशा ठिकाणांबाबत घनकचरा व्यवस्थापन विभागाने तातडीने प्रस्ताव सादर करावा आणि त्या प्रस्तावाच्या आधारे आवश्यक दुरुस्तीची कामे तात्काळ पूर्ण करण्यात यावीत.

आयुक्तांनी नागरिकांच्या दैनंदिन वापराशी निगडित या महत्त्वाच्या सुविधांबाबत स्वच्छता, पाण्याची उपलब्धता आणि देखभाल यावर विशेष भर देण्याच्या सूचना संबंधित विभागांना दिल्या.

या पाहणीदरम्यान अतिरिक्त आयुक्त विना पवार, उपायुक्त तैमूर मुलाणी, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, अतिक्रमण विभागाचे नियंत्रण अधिकारी तपन डंके, अंतर्गत लेखापरीक्षक राहुल कुलकर्णी, मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, सफाई अधीक्षक वाहन अनिल चाराटे,तसेच मुख्य आरोग्य निरीक्षक, आरोग्य निरीक्षक व सफाई कर्मचारी उपस्थित होते.

# भाजपमध्येच ‘महिला सुरक्षा’ धोक्यात!

# तेजस्विनी कदम प्रकरणाने उघड केलं सत्ताधाऱ्यांचं ‘महिला द्वेषी’ रूप!

**पिंपरी-चिंचवड (कटूसत्य वृत्त) :-** भाजपच्या महिला नेत्या, युवा मोर्चा प्रदेश सचिव तेजस्विनी कदम यांना त्यांच्याच पक्षाच्या युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांनी ‘संपवण्यासाठी’ गुंड पाठवल्याचा धक्कादायक आरोप समोर आला आहे!

या गुंडांनी थेट चिंचवड पोलीस ठाण्यातच पोलिसांसमोर तेजस्विनी कदम यांना मारहाण केली. आणि सगळ्यात संतापजनक बाब म्हणजे एवढं घडल्यानंतरही अनुप मोरेवर अजूनपर्यंत कोणताही गुन्हा दाखल झाला नाही!

या घटनेने पुन्हा एकदा सिद्ध केलं आहे की, भाजप सरकार, भाजप नेते आणि भाजपच्या इशाऱ्यावर चालणारं प्रशासन महिला द्वेषी आहे!

राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) काँग्रेस पार्टीचे आमदार रोहित पवार यांनी आपल्या फेसबुक पोस्टमधून संताप व्यक्त करत म्हटलं, ‘मी या दोघांनाही (तेजस्विनी कदम व अनुप मोरे) ओळखत नाही, पण एखाद्या महिलेला संपवण्याचा प्रयत्न हा कोणत्या कायद्यात बसतो?

पोलिसांसमोरच महिलेला मारहाण होते, आणि पोलिस डोळ्यावर पट्टी बांधून बसतात. मग राज्याची कायदा व सुव्यवस्था कोण राखणार?’ त्यामुळे ‘राज्यात केवळ सामान्य महिला नाही, तर सत्ताधाऱ्यांच्या पक्षातील महिलाही सुरक्षित नाहीत!’ असं कोणी म्हटलं तर वावगं ठरू नये.

रोहित पवार यांनी पुढे राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना थेट उद्देशून विचारलं, ‘हे राज्यात चाललंय नेमकं काय? महाराष्ट्रात कायदा उरलाय का फक्त सत्ताधाऱ्यांसाठी?’

### प्रशासन गप्प, आरोपी ‘अस्पृश्य’?

या प्रकरणानंतर चिंचवड पोलिसांच्या निष्क्रियतेवर जनतेचा आणि महिलांच्या संघटनांचा संताप उसळला आहे. महिलांना सुरक्षित वातावरण देण्याचे दावे करणाऱ्या भाजप सरकारच्या मुखवट्याखालील ‘महिला द्वेषी वृत्ती’ उघडी पडल्याचं भाष्य राजकीय वर्तुळात होत आहे.

मुंडे प्रकरणानंतर अजून शाई सुकायचीही नाही तोच तेजस्विनी कदम प्रकरणाने राज्यातील कायदा-सुव्यवस्थेची पोलखोल केली आहे. सरकारच्या संरक्षणाखाली असलेले गुंडच जर महिला पदाधिकाऱ्यांवर हल्ले करत असतील, तर सामान्य स्त्रियांना कोण संरक्षण देणार, राज्यातील कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित राहीला आहे. असा सवाल आता महाराष्ट्रभरातून उपस्थित होतो आहे.

# शेकापला बळ देण्यासाठी एकत्र या; कार्यकर्त्यांच्या पाठीशी ठाम - आ.देशमुख



**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** "शेतकरी कामगार पक्ष (शेकाप) हा सर्वसामान्य शेतकरी, कामगार आणि युवकांचा खरा आवाज आहे. गेली पन्नास वर्षे गौडवाडीसह सांगोला तालुका शेकाप आणि देशमुख कुटुंबासोबत खंबीरपणे उभा आहे. पुढेही अशीच साथ देऊन पक्षाला बळकटी द्या," असे आवाहन आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी केले.

सांगोला तालुक्यातील गौडवाडी येथे आयोजित शेतकरी कामगार पक्षाच्या भव्य मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी कार्यकर्त्यांनी आमदार डॉ. देशमुख यांचा डाळिंबाच्या हाराने नागरी सत्कार केला.आ. देशमुख म्हणाले की, ‘आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये शेकापची ताकद अधिक वाढविण्याचा आमचा संकल्प आहे. मी प्रत्येक कार्यकर्त्याच्या पाठीशी ठामपणे उभा आहे. कोणत्याही कार्यकर्त्यावर दादागिरी किंवा दमदाटी झाली, तर ती सहन केली जाणार नाही,’ असे स्पष्ट शब्दांत त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला शेकापचे चिटणीस दादाशेठ बाबर, दीपक गोडसे, शिवाजीराव व्हनमाने यांच्यासह पुरोगामी युवक संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मेळाव्याच्या निमित्ताने कोळा ते गौडवाडी असा भव्य बाईक रॅलीचा देखील आयोजन करण्यात आला होता. या रॅलीत तब्बल ७५० मोटारसायकली सहभागी झाल्या. या रॅलीमुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

# कार्तिकी यात्रा; शहरात मांस, मटण विक्रीस मनाई

**पंढरपूर,(कटूसत्य वृत्त):-** कार्तिकी शुध्द एकादशी 02 नोव्हेंबर 2025 रोजी असून, कार्तिकी यात्रा कालावधी दि. 22 ऑक्टो. ते 05 नोव्हेंबर आहे. या यात्रा कालावधीत शहरात श्री विठ्ठल- रुक्मिणी दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. या वारी कालावधीमध्ये दिनांक 30 ऑक्टो. ते 03 नोव्हेंबर 2025 या कालावधीत पंढरपूर शहरातील मांस, मटण, मासे विक्री व प्राणी कत्तल तसेच मांसजन्य पदार्थ विक्री करणे यावर बंदी घालण्यात आल्याचे आदेश उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी निर्गमित केले आहेत.

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 चे कलम 163 अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन उपविभागीय दंडाधिकारी श्री. इथापे यांनी ऑक्टो. ते 03 नोव्हेंबर 2025 या कालावधीत पंढरपूर शहरातील मांस, मटण, मासे विक्री व प्राणी कत्तल तसेच मांसजन्य पदार्थ विक्री करणे यावर घालण्यात आली आहे.

# संभाजी ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्षपदी सचिन जगतापांची निवड



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत):-** सोलापूर जिल्ह्यातील तरुणांचे संघटक जाळे निर्माण करणारे सचिन जगताप यांची संभाजी ब्रिगेड अध्यक्ष मनोज आखरे यांनी पश्चिम महाराष्ट्र अध्यक्षपदी निवड केली असून निवडीबद्दल सर्व क्षेत्रातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

संभाजी ब्रिगेडचा कार्यकर्ता म्हणून अल्पावधीतच आपली लेखणी वक्तृत्व आणि कर्तुत्वाच्या जोरावर संभाजी ब्रिगेड माढा तालुका उपाध्यक्ष आणि नंतर तालुकाध्यक्ष या पदावर सचिन जगताप यांची नेमणूक झाली.तालुकाध्यक्ष पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर संभाजी ब्रिगेडच्या माध्यमातून त्यांनी प्रचंड मोठा वैचारिक झंजावात संपूर्ण माढा तालुकाभर निर्माण केला तो आजही त्याच ताकतीने चालू आहे.सचिन जगताप यांनी संभाजी ब्रिगेड माढा तालुकाध्यक्ष असताना अवघ्या सहा ते सात महिन्यात संभाजी ब्रिगेडच्या ५५ ते ६० शाखा नव्याने चालू केल्या त्या आजही त्याच ताकदीने कार्यरत आहेत. आपल्या ठायी असलेल्या सदगुणांच्या मुळे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा, व्यापार, उद्योग, व्यवसाय, शेती, शासकीय-प्रशासकीय क्षेत्रातील बऱ्याच दिग्गजांशी सचिन जगताप यांचे सलोख्याचे व आपुलकीचे संबंध प्रस्थापित झाले. ठराविक काळानंतर सचिन जगताप संभाजी ब्रिगेड सोलापूर जिल्हाध्यक्ष म्हणून काम पाहू लागले.

मराठा क्रांती मूक मोर्चा वेळी सोलापूर जिल्ह्यात गावागावात जाऊन मराठा समाजाला जागृत करण्यापासून ते मराठा क्रांती ठोक मोर्चा वेळी आषाढी एकादशीला पंढरपूर येथे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणाऱ्या शासकीय विठ्ठल पूजेच्या विरोधातील आंदोलनात सचिन जगताप यांची आक्रमक भूमिका अतिशय वाखाणण्याजोगी होती. संभाजी ब्रिगेडच्या माध्यमातून सचिन जगताप यांनी जनसामान्यांसाठी वेळोवेळी विविध आंदोलनाच्या माध्यमातून शासन प्रशासनाला धारेवर धरलं आहे,अनेक केसेस अंगावर घेतल्या आहेत.शेतकरी कर्जमाफीसाठी आंदोलन,वीज कनेक्शन तोडणी विरोधात आंदोलन,विविध आंदोलने सचिन जगताप यांच्या नेतृत्वात आजपर्यंत सोलापूर जिल्ह्यात झाली आहेत. कुर्डू ता.माढा येथील बेंद ओढ्यातील पाण्यासाठी संभाजी ब्रिगेडच्या माध्यमातून सचिन जगताप यांच्या नेतृत्वाखाली जवळपास ३५ ते ४० दिवस आंदोलन चालले.ते यशस्वी झाले.तसेच राज्य सरकारकडून उजनी धरणातील सोलापूर जिल्ह्याचे हक्काचे पाच टीएमसी पाणी इंदापूर तालुक्याला वळवण्याचा घाट घातला गेला होता.त्या विरोधात संभाजी ब्रिगेड,जनहित शेतकरी संघटना,प्रहार संघटना यांच्या माध्यमातून पुकारलेले आंदोलन जवळपास १८ ते २० दिवस चालले.त्यात सचिन जगताप यांचा सक्रिय सहभाग होता.ते आंदोलन सुद्धा यशस्वीपणे पार पडले.२०१६ साली संभाजी ब्रिगेड राजकीय पक्ष झाल्यापासून प्रस्थापित पक्षांच्या घराणेशाहीचे राजकारण चालणाऱ्या सोलापूर जिल्ह्यात संभाजी ब्रिगेडच्या माध्यमातून सचिन जगताप यांच्या नेतृत्वाखाली 2017 साली पंचायत समिती-जिल्हा परिषद पंचवार्षिक निवडणूक सोलापूर जिल्ह्यात जवळपास सर्वच ठिकाणी लढल्या गेली.त्यापैकी मोडनिंब जिल्हा परिषद गटातील संभाजी ब्रिगेडच्या उमेदवाराला अगदी काही थोड्या मतांनी पराभव स्वीकारावा लागला होता.त्यानंतर सोलापूर जिल्ह्यात संभाजी ब्रिगेडच्या माध्यमातून सचिन जगताप यांच्या नेतृत्वात जिल्ह्यातील विविध ग्रामपंचायत निवडणुका, २०१९ ची लोकसभा, विधानसभा, सोलापूर विद्यापीठातील सिनेट निवडणूक, मेडिकल कौन्सिल निवडणूक, पुणे पदवीधर मतदारसंघ निवडणूक या सर्व निवडणुका सोलापूर जिल्ह्यात संभाजी ब्रिगेडच्या माध्यमातून सचिन जगताप यांच्या नेतृत्वात पूर्ण तयारीनिशी लढल्या गेल्या.तसेच गतवर्षीच्या लोकसभा विधानसभा निवडणुकीत दोन्ही उमेदवार निवडून आणण्यात सक्रिय सहभाग होता.जनसामान्यांच्या शेतीच्या समस्या, दवाखान्याच्या समस्या, शालेय महाविद्यालयीन समस्या, प्रशासनातील समस्या यावर सर्वसामान्यांसाठी तत्पर असणा-या नेतृत्वाची निवड झाल्याबद्दल कार्यकर्त्यांमधून समाधान व्यक्त होत आहे.

# सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ लागू

**सोलापूर, (कटूसत्य वृत):-** देशात व राज्यात दहशतवादी कारवायांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात (पोलीस आयुक्तालय हद्द वगळून) भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ लागू करण्यात आले आहे. हा आदेश २७ ऑक्टोबर २०२५ पासून पुढील ६० दिवस प्रभावी राहणार असून, याबाबतचे पत्रक अपर जिल्हादंडाधिकारी अभिजीत पाटील यांनी जारी केले आहे.

या आदेशानुसार, जिल्ह्यातील घरमालक, प्रॉपर्टी डिलर, वाहन विक्रेते, भाडेकरू सेवा पुरवठादार, तसेच धार्मिक स्थळांचे विश्वस्त व काळजीवाहक यांना खालील बाबींवर बंदी घालण्यात आली आहे:

**प्रतिबंधित कृत्ये :**

1. नवीन अनोळखी व्यक्तींना निवासासाठी जागा उपलब्ध करून देताना पोलीस ठाण्याला माहिती न देणे

- अशा व्यक्तींची संपूर्ण माहिती संबंधित पोलीस ठाण्याला तात्काळ देणे बंधनकारक आहे.

2. जुने वाहन खरेदी-विक्री किंवा भाड्याने देताना अनोळखी व्यक्तींची माहिती पोलीस ठाण्याला न देणे

- वाहन व्यवहारात सहभागी होणाऱ्या प्रत्येक अनोळखी व्यक्तीची माहिती पोलीस ठाण्याला देणे आवश्यक आहे.

या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ अंतर्गत कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही पत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

# जिल्हास्तर युवा महोत्सव 2025-26: युवकांच्या प्रतिभेला वाव देणारा बहुपर्यायी उपक्रम - जिल्हाधिकारी आशीर्वाद

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** युवकांचा सर्वांगीण विकास साधणे, भारतीय संस्कृती व परंपरेचे जतन करणे, युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देणे तसेच राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत करणे या उद्देशाने युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकारतर्फे प्रतिवर्षी राष्ट्रीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. सन 2025-26 या वषार्साठी "विकसित भारत चॅलेंज ट्रॅक" अंतर्गत राष्ट्रीय युवा महोत्सवाचे आयोजन दिनांक 10 ते 12 जानेवारी 2026 या कालावधीत करण्यात येणार आहे. या महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी आवश्यक असलेला निधी जिल्हा क्रीडा परिषद मधून खर्च करावा व शासनाकडून निधी प्राप्त झाल्यावर क्रीडा परिषदेला निधी वर्ग करावा, अशा सूचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी देऊन हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत असे सूचित केले.

जिल्हाधिकारी यांच्या दालनात आयोजित जिल्हास्तर युवा महोत्सव आयोजनाच्या अनुषंगाने आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार तसेच अन्य समिती सदस्य उपस्थित होते.

युवा महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राज्यात जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार असून, त्यामध्ये सांस्कृतिक व नवोपक्रम (Cultural and Innovation Track) या दोन प्रमुख मार्गांचा समावेश आहे. जिल्हास्तर व विभागस्तरावरील स्पर्धा दिनांक 15 नोव्हेंबर 2025 पर्यंत पार पडणार असून, त्यानंतर राज्यस्तरीय स्पर्धा दिनांक 10 डिसेंबर 2025 रोजी आयोजित करण्यात येणार आहेत. विज्ञान प्रदर्शन हे नवोपक्रम ट्रॅक अंतर्गत फक्त राज्यस्तरापर्यंतच मर्यादित राहणार आहे, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी दिली.

सांस्कृतिक व कौशल्य विकास स्पर्धांमध्ये खालीलप्रमाणे सहभाग निश्चित करण्यात आला आहे: लोकनृत्य (गट) - 10, लोकगीत (गट) - 10, कथालेखन - 03, चित्रकला - 02, वक्तृत्व - 03, कविता लेखन - 30. केंद्र शासनाने निश्चित केलेल्या नियमावलीनुसार वेळ, सहभाग संख्या व इतर अटी लागू राहतील. लोकनृत्य व लोकगीत गटांमध्ये वाद्यवृंदाची संख्या निर्धारित सहभाग संख्येमध्ये अंतर्भूत राहील.

या युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्यासाठी युवक/युवतींचा वयोगट दिनांक 12 जानेवारी 2026 रोजी 15 ते 29 वर्षांच्या दरम्यान असणे आवश्यक आहे. जन्मतारीख दर्शविणारे सबळ पुरावे सादर करणे बंधनकारक आहे, असे श्री. पवार यांनी सांगितले. नवोपक्रम ट्रॅक अंतर्गत जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी शासनाकडून रुपये 50,000 इतके अनुदान मंजूर करण्यात आले आहे, असे ही त्यांनी सांगितले.